७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १९ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# ‘लालपरी’चा प्रवास महागणार?

## डिझेल दरवाढीमुळे महामंडळावर वार्षिक १२४ कोटींचा अतिरिक्त भार, परिवहन मंत्र्यांकडून भाडेवाढीचे संकेत

**मुंबई (दै. संध्या)**



जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या तणावाचा फटका आता सर्वसामान्यांची वाहिनी असलेल्या 'एसटी बस'ला बसण्याची शक्यता आहे. देशातील इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या तिकिटात वाढ होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या गंभीर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत परिवहन मंत्र्यांनी भविष्यातील तिकीट दरवाढीचे स्पष्ट संकेत दिले आहेत; मात्र ही भाडेवाढ तातडीने लागू होणार नसल्याने प्रवाशांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे महामंडळाच्या तिजोरीवर पडणाऱ्या आर्थिक भाराची आकडेवारी स्पष्ट केली. प्रताप सरनाईक म्हणाले, "मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला डिझेलचा दर आता ९१.३१ रुपये झाला आहे. (इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत हा पुरवठा केला जातो). एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सोसावा लागत आहे. हा भार मासिक स्तरावर १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर तब्बल १२४ कोटी रुपयांवर जाणार आहे."

एसटी महामंडळ आधीच मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करत असल्याचे सांगत प्रताप सरनाईक यांनी माहिती दिली की, एकट्या एप्रिल २०२६ या एका महिन्यात महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चामुळे महामंडळाची आर्थिक स्थिती खालावली असून, भविष्यात सेवा टिकवून ठेवण्यासाठी प्रवासी भाडेवाढ करणे आवश्यक ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले. सर्वसामान्यांच्या खिशाचा विचार करता, भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला तरी तो तातडीने लागू केला जाणार नाही. केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला भाडेवाढीचा प्रस्ताव प्रथम 'राज्य परिवहन प्राधिकरणाकडे' मान्यतेसाठी सादर केला जाईल. प्राधिकरणाची अधिकृत मंजुरी मिळाल्यानंतरच भाडेवाढीचा अंतिम निर्णय घेतला जाईल, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. "ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक जीवनवाहिनी आहे. प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी सरकार इतर पर्यायांवर काम करत आहे. यामध्ये इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, अंतर्गत खर्च नियंत्रण आणि महसूलवाढीच्या नवनवीन उपाययोजनांवर विशेष भर दिला जात आहे. एसटीची सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे सध्या महामंडळासमोरील प्रमुख आव्हान आहे," असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# ठाकरेंचे खासदार टप्प्याटप्प्याने शिंदेंच्या संपर्कात

**मुंबई (दै. संध्या)**




आता हिंगोलीच्या खासदाराने घेतली एकनाथ शिंदेंची भेट

राज्यात एकीकडे ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू असतानाच आता ठाकरेंच्या एका खासदाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी शिंदेंची भेट घेतली. या भेटीमागचं नेमकं कारण अद्याप समोर आलं नाही. मात्र, ठाकरेंच्या शिवसेनेला यामुळे धक्का बसणार अशी चर्चा पुन्हा रंगली आहे. एकीकडे एकनाथ शिंदे यांचे नेते ऑपरेशन टायगरवर अनेक दावे करताना दिसत आहेत. ठाकरेंचे जवळपास सात खासदार शिंदेंच्या शिवसेनेत जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. अशात हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी नंदनवन या शिंदेंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. मतदारसंघातील विकासकामे आणि निधीसाठी ही भेट घेतल्याचा दावा आष्टीकरांच्या कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. मात्र ठाकरेंचे काही खासदार हे टप्प्याटप्प्याने एकनाथ शिंदेंच्या संपर्कात येत असल्याचं दिसतंय. काही दिवसांपूर्वी खासदार संजय दिना पाटील यांची एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. त्याचसोबत परभणीचे खासदार संजय जाधव हेदेखील ठाकरेंची साथ सोडून शिंदेच्या शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. अशात आता नागेश पाटील आष्टीकर यांनी देखील एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. नागेश पाटील आष्टीकर हे महायुतीच्या संपर्कात असल्याच्या या आधीही चर्चा रंगल्या होत्या. नागेश पाटलांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी त्यांना फोन करून शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर नागेश पाटील हे महायुतीसोबत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली होती.

# मुंबई महापालिकेतील ७९ नगरसेवकांच्या निवडीला आव्हान!

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबई महानगरपालिका निवडणूक 2026 संदर्भात एक मोठी माहिती समोर आली असून, थेट 79 नगरसेवकांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या निवडणूक याचिका न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. यातील अनेक याचिका सध्या न्यायप्रविष्ट असून काही प्रकरणांवर सुनावणी देखील सुरू आहे. मात्र एवढ्या मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधींच्या निवडीविरोधात आक्षेप घेतले गेल्यामुळे संपूर्ण मुंबई महापालिका निवडणूक प्रक्रियेवरच आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या संदर्भातील माहिती माहिती अधिकार कायद्यान्वये आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांना मुंबई महानगरपालिकेच्या विधी खात्याकडून देण्यात आली आहे. गलगली यांनी निवडणुकीनंतर विविध प्रभागांमध्ये दाखल झालेल्या निवडणूक याचिकांची माहिती मागवली होती. आता या समोर आलेल्या माहितीनुसार, प्रभाग 119 'एस' मधील मोहम्मद अन्वर अब्दुल्ला शेख यांनी शिवसेनेचे नगरसेवक राजेश सोनावळे आणि इतर उमेदवारांच्या विरोधात दाखल केलेली निवडणूक याचिका लघुन्यायालयाने फेटाळून लावली आहे. मात्र, उर्वरित अनेक प्रकरणांमध्ये अद्याप प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. न्यायालयात आव्हान देण्यात आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये विविध राजकीय पक्षांच्या आणि मुंबईतील 'एच/पूर्व', 'के/पूर्व', 'एस', 'एम/पूर्व', 'एफ/उत्तर', 'आर/उत्तर', 'पी/दक्षिण' व 'जी/उत्तर' या महत्त्वाच्या प्रभागांतील नगरसेवकांचा समावेश आहे. निवडणूक प्रक्रियेतील कथित गैरप्रकार, मतमोजणीतील आक्षेप, उमेदवारी अर्जाबाबतचे वाद आणि निवडणूक नियमांचे उल्लंघन यांसारख्या विविध मुद्द्यांवरून या याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

# शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची सीबीआय कोठडी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडले असून सीबीआयने कारवाईचा धडाका लावला आहे. पेपरफुटीचे लातूर कनेक्शन समोर आले लातूरमधील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग क्लासेसच्या शिवराज मोटेगावकरला सीबीआयने अटक केली आहे. तत्पूर्वी सीबीआयने मोटेगावरची ट्रान्झिट रिमांड घेतली होती, 2 दिवसांच्या ट्रान्झिट रिमांडमधील प्राथमिक चौकशीत शिवराज मोटेगावकरकडे महत्त्वाचे पुरावे हाती लागल्यानंतर सीबीआयने मोटेगावरकरला अटक करुन आज त्याला सीबीआयच्या कोर्टात हजर केले होते. त्यावेळी, सीबीआय कोर्टाने आरोपीला 9 दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे.

सीबीआयने शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर आज न्यायालयात हजर करण्यात आले. तत्पूर्वी, ट्रान्झिट रिमांडमध्ये सीबीआयला मोटेगावकरकडून महत्वाची माहिती मिळाली, काही पुरावेही मिळाले, त्यातूनच त्याला अटक करण्यात आली. त्यानुसार, शिवराज मोटेगावकरने 23 एप्रिल रोजी केमिस्ट्रीचा पेपर मिळवला होता, त्याच्या मोबाईलमध्येच लिकड प्रश्नपत्रिका सीबीआयला आढळून आली. तसेच, शिवराज मोटेगावकर हा सेवानिवृत्त प्राध्यापक प्रल्हाद कुलकर्णीसोबत पेपरफुटीत सहभागी होता, हेही निदर्शनास आले. सीबीआय कोर्टात न्यायाधीशांनी तपास अधिकाऱ्यांना एक प्रश्न विचारला, मोटेगावकरकडे प्रश्नपत्रिका आहेत हे तुम्हाला कसं कळलं? त्यावर, निवृत्त प्राध्यापक कुलकर्णी हा शिवराजसोबत संपर्कात होता, त्याद्वारे ही बाब समोर आली आहे. येथील कोचिंग सेंटरमार्फतच प्रश्नपत्रिकांचे वितरण सुरू होते, अशी माहिती तपास अधिकारी पवन कौशिक यांनी न्यायालयात दिली. त्यानंतर, सीबीआयने आरोपीसाठी 10 दिवसांची सीबीआय कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने 9 दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली. त्यामुळे, पुढील 9 दिवस आता शिवराज मोटेगावकरचा मुक्काम सीबीआय कोठडीत असणार आहे. दरम्यान, तुम्हाला काही पश्चाताप आहे का? असा प्रश्न शिवराज मोटेगावकरला पत्रकारांनी विचारला असता, त्याने पत्रकाराकडे रागाने बघितलं.

दरम्यान, शिवराज मोटेगावकरला अटक केल्यानंतर आरसीसीच्या संभाजीनगरच्या शाखेतील क्लास बंद केल्याची चर्चा होती. मात्र, आजपासून ते 2 जूनपर्यंत आधीच सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच उन्हाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र, आज मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर क्लास बंद पडल्याच्या अफवा पसरल्या आहेत. पण, प्रत्यक्षात माहिती घेतली असता अगोदरच सुट्ट्या जाहीर झाल्याचं सांगण्यात आलं.

नीट परीक्षा पेपरफुटीचे पडसाद पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेतही पाहायला मिळाले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत काँग्रेसकडून आंदोलन करण्यात आले. पुण्यातील मॉर्डन कॉलेजच्या पदाधिकारी आणि शिक्षकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नीट परीक्षा घोटाळ्यामध्ये मॉर्डन कॉलेजच्या शिक्षकाचा सहभाग असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. मॉडेल कॉलेजच्या प्राचार्य निवेदिता एकबोटे या भाजपच्या नगरसेविका आहेत, त्यांच्यासमोरच काँग्रेसने आंदोलन केले. त्यांच्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

ढिंग-टांग




### ट्रक - कंटेनरच्या टक्करमध्ये १२ ठार : २५ गंभीर, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील घटना

# साखरपुड्याला जाणाऱ्या वऱ्हाड्यांचा मृत्यू

**मुंबई (दै. संध्या)**





मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रविवारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक अपघाताची घटना घडली आहे. साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी वऱ्हाडी घेऊन जाणाऱ्या एका आयशर ट्रकची आणि कंटेनरची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात 12 जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर 20 ते 25 जण गंभीर जखमी झालेत. अपघाताची भीषणता पाहता मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे लग्नघरातील आनंदाच्या वातावरणावर विरजण पडले असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, डहाणू तालुक्यातील बापूगाव येथून आयशर ट्रकमधून १०० पेक्षा जास्त वऱ्हाडी एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी निघाले होते. सर्वजण आनंदाच्या वातावरणात प्रवासाचा आनंद घेत असतानाच, पालघर जिल्ह्यातील धानीवरी गावाजवळ ही दुर्घटना घडली. भरधाव वऱ्हाड्यांचा ट्रक आणि समोरून येणाऱ्या कंटेनरमध्ये अत्यंत जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, धडकेनंतर आयशर ट्रक आणि कंटेनर दोन्ही वाहने रस्त्यावरच पलटी झाली.

या भीषण अपघातात ट्रकचा चक्काचूर झाला असून आत बसलेले वऱ्हाडी खाली चेपले गेले. प्राथमिक माहितीनुसार, आतापर्यंत १२ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मृतांमध्ये आणि गंभीर जखमी झालेल्यांमध्ये महिला तसेच निष्पाप लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. अपघात होताच महामार्गावर आरडाओरडा आणि किंकाळ्यांनी परिसर हादरून गेला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ट्रकमध्ये अडकलेल्या जखमींना नागरिकांच्या मदतीने बाहेर काढून तातडीने कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने डॉक्टरांचे पथक युद्धपातळीवर उपचार करत आहे.

या भीषण अपघातामुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला सारून काही वेळात वाहतूक पूर्ववत केली. हा अपघात नेमका कसा झाला, याचे अचूक कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी प्राथमिक अंदाजानुसार वाहनाचा भरधाव वेग आणि चालकाचा निष्काळजीपणा यामुळे हा अपघात झाला असावा, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. कासा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# रोहित पवारांकडे राष्ट्रवादीच्या ४० लोकांची नावे

## हे सर्व भाजपात जातील; काँग्रेस प्रवक्त्यांचा गौप्यस्फोट

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या काही आलबेल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. नुकतेच राष्ट्रवादीचे सरचिटणीस राहिलेल्या आनंद परांजपे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. दुसरीकडे राष्ट्रीय कार्यकारिणीवरुन प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे नाराज असल्याची देखील चर्चा सुरू आहे. त्यातच, पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने ही चर्चा आणखी गडद झाली असून आमदार रोहित पवारांनीही भाष्य केलं. राष्ट्रवादीतील 24 आमदार भाजपात जातील, असा गौप्यस्फोट रोहित पवार यांनी केला होता. त्यावर, आता काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनीही खो दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेमकं कोण चालवत आहे. शरद पवार, भाजपा, सुनील तटकरे की प्रफुल पटेल? नेमकं कोण चालवत आहे, असा सवाल काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी उपस्थित केला. तसेच, रोहित पवार यांच्याकडे राष्ट्रवादीतील 40 लोकांची नावे आहेत, जे भाजपमध्ये जाणार आहेत, असेही त्यांनी म्हटले. रोहित पवार यांच्या मताशी मी सहमत आहे, जेपी नड्डा यांनी म्हणलं होतं विरोधी पक्ष राहणार नाही. त्यातच, सातत्याने अशा बातम्या येत आहे, सत्तेत गेल्यावर हे फुटणार आहेत, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटणार असल्याचा गौप्यस्फोट अतुल लोंढे यांनी केलाय.

अतुल लोंढेंना शिवसेना उबाठा पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या विधान परिषदेतील उपस्थितीसंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, पंतप्रधान नरेंद्र मोदींची उपस्थिती किती वेळा आहे? असा सवाल त्यांनी विचारला. तसेच, त्यांची उपस्थिती अतिशय कमी आहे, ते टिंगल टवाळी करायला संसदेत येत आहेत. उध्दव ठाकरे यांची त्यांच्यापेक्षा जास्त आहे. पण, त्यांची उपस्थिती कमी होती हे खरं आहे, असेही लोंढे यांनी म्हटले. दरम्यान, आमदार सदाभाऊ खोत यांच्यावर टीका करताना, सदाभाऊ स्वतः घुबड आहेत, अशा शब्दात अतुल लोंढेंनी सदाभाऊंवर टीका केली.

# संपादकीय

# पेट्रोल-डिझेल खिसा कापणार? : आकड्यांचं गणित

पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी १५ मेपासून पेट्रोल व डिझेलच्या किमतीत प्रतिलिटर ३ रुपये, तर सीएनजीच्या किमतीत प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे तेल कंपन्यांना पेट्रोलवर प्रतिलिटर २४ रुपये, तर डिझेलवर प्रतिलिटर ३० रुपयांचा तोटा सहन करावा लागत असून, तेल कंपन्यांना दररोज साधारणत: २४०० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागतो, असे सरकारचे म्हणणे आहे. अमेरिका-इस्रायल व इराण युद्ध सुरू झाल्यानंतर केंद्र सरकारने देशात ७४ दिवस पुरेल इतका (म्हणजेच १३ मेपर्यंत पुरेल इतका) कच्च्या तेलाचा साठा असल्याचे वारंवार सांगितले होते. याचाच अर्थ पेट्रोल व डिझेलची विक्री देशात उपलब्ध असलेल्या जुन्या किमतीच्या साठ्यातूनच आतापर्यंत केली जात होती. त्यामुळे पेट्रोल व डिझेलच्या किमतीत वाढ न केल्यामुळे तेल कंपन्यांना दररोज २४०० कोटी रुपयांचा तोटा होत असल्याचे गणित कसे जुळणार? आता जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकल्यामुळे तेल कंपन्यांना खरोखरच मोठ्या प्रमाणात तोटा होत आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न. १५ मे २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात ब्रेंट कच्च्या तेलाची किंमत १०७.२९ डॉलर प्रतिबॅरल व एक डॉलरची किंमत ९५.७६ रुपये होती. म्हणजेच एक लिटर कच्च्या तेलाची किंमत ६४.७१ रुपये प्रतिलिटर होती. त्यात आयातीचा खर्च, वाहतुकीचा व तेलशुद्धीकरणाचा खर्च तसेच विक्रेत्याचे कमिशन याचा विचार करता पेट्रोलची किंमत कमाल ७०.५१ रुपये प्रतिलिटर येते. त्यासाठी मुंबईमध्ये ग्राहकांना प्रतिलिटर १०६.६८ रुपये मोजावे लागतात. याचाच अर्थ ग्राहकांना आजही पेट्रोलसाठी प्रतिलिटर किमान ३६.१७ रुपये केंद्र व राज्य सरकारचे विविध प्रकारचे कर तसेच तेल कंपन्यांच्या नफ्यापोटीमोजावे लागतात. मुळात आपण कच्च्या तेलाची ६० ते ६२ डॉलर प्रतिबॅरल किंमत असताना तसेच डॉलरची किंमत साधारणत: ८७ रुपये प्रतिडॉलर असताना कच्च्या तेलाचे साठे केले होते. तसेच, रशियाने आपल्याला कच्च्या तेलावर मोठ्या प्रमाणात सवलत दिलेली होती. याचा विचार करता ज्या पेट्रोलची किंमत प्रतिलिटर ४५ रुपयांहून कमी होती. त्यासाठी नाशिकमधील ग्राहक १४ मेपर्यंत १०४.७८ रुपये प्रतिलिटर मोजत होते. असे असतानाही तेल कंपन्यांना पेट्रोल व डिझेलवर प्रतिलिटर २४ रुपये व ३० रुपये तोटा होतो, हे कसे? पेट्रोल व डिझेलवर आकारण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या कराच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. उदा. २०२४-२५ या आर्थिक वर्षात केंद्र सरकारला पेट्रोल व डिझेलवरील कराचे ४ लाख १५ हजार १८१.४० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. तर राज्य सरकारांना ३ लाख २५ हजार ५८३.१५ कोटी रुपयांचे कराचे उत्पन्न मिळाले. २०२४-२५ या आर्थिक वर्षात चार सरकारी तेल कंपन्यांना ७० हजार कोटी रुपयांचा नफा झाला होता, तर २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या केवळ सुरुवातीच्या नऊ महिन्यांत आरआयएल, आयओसी, बीपीसीएल व एचपीसीएल या सरकारी मालकीच्या चार तेल कंपन्यांनी १.३७ लाख कोटी रुपयांचा नफा मिळविलेला आहे. तर एचपीसीएल या तेल कंपनीला मार्च २०२६ अखेर संपलेल्या चौथ्या तिमाहीत ४९०१.५० कोटी रुपयांचा आजवरचा सर्वोच्च नफा मिळालेला असून, गेल्यावर्षातील याच तिमाहीच्या तुलनेत नफ्यात ४६ टक्के वाढ झालेली आहे. तेल कंपन्या जगातील ४१ राष्ट्रांकडून कच्चे तेल खरेदी करीत असतात. त्या ब्रेंट कच्च्या तेलाव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात इतर कमी किमतीचे कच्चे तेलही खरेदी करीत असतात. कच्च्या तेलाच्या किमती कमी असतात, त्यावेळी त्या देशातील संबंधित तेल कंपन्यांशी किमान तीन महिन्यांचा करार करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली तरी आपल्या तेल कंपन्या वाढीव दराने नव्हे तर कराराप्रमाणे कमी किमतीत तेल खरेदी करतात.

## संस्कृत सुभाषित

हा माझा अन् तो दुसऱ्याचा वाटे क्षुद्र मनुष्याला।
सारी पृथ्वी असे एक घर वाटे विशाल हृदयीला।।

अर्थ – हा माझा, तो दुसऱ्याचा अशी क्षुद्र मनाच्या माणसांची वृत्ती असते. याउलट मोठ्या मनाच्या लोकांना मात्र सर्व पृथ्वीच आपले कुटुंब वाटत असते. त्यांच्या ठिकाणी क्षुद्र भेदभाव नसतो. त्याचे हृदय विशाल, उदार असते.

## गुरु वचन

### आनंदी राहण्याचा निर्णय घ्या : सुधांशु महाराज

आनंदी राहणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख–शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## उपदेशकथा

### श्रद्धेचे फळ

सुप्रसिद्ध निर्माता–दिग्दर्शक मेहबूब खान 'मदर इंडिया'ची निर्मिती करीत होते तेव्हा त्यांच्यावर बऱ्याच संकटाचा वर्षाव झाला. त्यांची स्वत:ची तब्येत बिघडली. चित्रपटाचं बजेटही वाढलं. वितरकांशी पूर्वी त्यांनी कधी लेखी करार केले नव्हते. केवळ विश्वासावर व्यवहार केले होते. चित्रपटाची किंमत वाढवली नव्हती पण खर्चाचं पारडं जड झालेलं होतं. मेहबूब खाननं पैशाच्या पूर्ततेसाठी आपली सर्व मालमत्ता गहाण टाकली. स्टुडिओ तारण ठेवून पैसे उभे केले आणि निष्ठापूर्वक चित्रपटाचं काम पूर्ण केलं. मेहबूब खान यांची कामावर आणि परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा होती. ठरल्याप्रमाणे मेहबूब खान चित्रपटाच्या निगेटिव्हज घेऊन पवित्र मक्केच्या यात्रेला गेले व तेथून लंडनला जाऊन चित्रपटावरच्या रासायनिक प्रक्रिया पूर्ण केल्या. ढासळणाऱ्या तब्येतीकडे आणि गुंतवलेल्या पैशाकडे दुर्लक्ष करून श्रद्धेने काम पूर्ण केलं. १९५८ मध्ये 'मदर इंडिया' प्रदर्शित झाला आणि एकट्या महाराष्ट्राला पंचवीस लाख मनोरंजन करपरतीमुळं मिळाले. महाराष्ट्र सरकारनं करमणूक कर माफ केला होता आणि उत्पन्नाचे विक्रम मोडले गेले होते.

कथा उपदेश : प्रत्यक्ष कामावर निष्ठा आणि परमेश्वरावर श्रद्धा असेल तर यश नक्की मिळते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ०८:४१:१९ |
| १९ मे २०२६ | योग:धृति १७:४८:०६ |
| मंगळवार | करण:गर १४:१८:४० |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज |
| अधिक ज्येष्ठ शके | २४:३९:२३+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:मिथुन |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:तृतीया १४:१८:४० | विनायक चतुर्थी |
| नक्षत्र:मृगशिर्षा | (अंगरक योग) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | | 1 | | | 2 |
| 6 | 8 | | | 9 | 4 | 3 | | |
| | 1 | 9 | | 3 | | | 6 | |
| 4 | | | 3 | | | 9 | | |
| | 3 | 8 | 9 | | 5 | 1 | 4 | |
| | | 5 | | | 6 | | | 8 |
| | 5 | | | 8 | | 6 | 7 | |
| | | 1 | 6 | 4 | | | 2 | 3 |
| 9 | | | 2 | | | | | 1 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 5 | 9 | 6 | 8 | 1 | 3 | 4 | 2 |
| 2 | 6 | 8 | 3 | 4 | 5 | 9 | 7 | 1 |
| 3 | 4 | 1 | 9 | 2 | 7 | 8 | 5 | 6 |
| 1 | 3 | 6 | 2 | 5 | 9 | 4 | 8 | 7 |
| 8 | 2 | 5 | 4 | 7 | 3 | 1 | 6 | 9 |
| 4 | 9 | 7 | 8 | 1 | 6 | 5 | 2 | 3 |
| 9 | 8 | 3 | 7 | 6 | 4 | 2 | 1 | 5 |
| 6 | 1 | 4 | 5 | 3 | 2 | 7 | 9 | 8 |
| 5 | 7 | 2 | 1 | 9 | 8 | 6 | 3 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५३६ – इंग्लंडचा राजा हेन्री आठव्याची दुसरी बायको ॲन बोलेनचा व्यभिचाराबद्दल शिरच्छेद.
- १५६८ – मेरी स्टुअर्टला अटक.
- १६०४ – कॅनडात मॉन्ट्रिआल शहराची स्थापना.
- १७४९ – इंग्लंडचा राजा जॉर्ज दुसऱ्याने ओहायो कंपनीला अमेरिकेतील ओहायो प्रदेशातील जागा दिली.
- १८४८ – मेक्सिकन–अमेरिकन युद्ध–ग्वादालुपे हिदाल्गोचा तह – मेक्सिकोने पराभव मान्य केला व कॅलिफोर्निया, नेव्हाडा, युटाह ही राज्ये व ॲरिझोना, कॉलोराडो, वायोमिंग व न्यू मेक्सिको राज्यांचा काही भाग अमेरिकेला १८,२५,००० अमेरिकन डॉलरला विकला.

### राष्ट्रीय

- २००६ – वादळी पावसामुळे आंध्र प्रदेशात २८ जणांचा मृत्यू झाले.
- २००७ – सानिया मिर्झा व अमेरिकेच्या वानिया किंगच्या जोडीने १४५००० डॉलर बक्षिसाच्या मोरक्को ओपन दुहेरी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

### जन्म

- १८७४ – गिल्बर्ट जेसप, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १८८२ – मोहम्मद मोसादेघ, ईराणचा पंतप्रधानचा जन्म.
- १९२६ – स्वामी क्रियानंद, भारतीय तत्त्वज्ञानीचा जन्म.

### निधन

- १५२६ – गो–काशीवाबारा, जपानी सम्राटचे निधन.
- १८९८ – विल्यम इवार्ट ग्लॅड्टोन, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधानचे निधन.
- १९०४ – जमशेदजी टाटा, आधुनिक औद्योगिक भारताचे शिल्पकार व टाटा उद्योग समुहाचे संस्थापकचे निधन.

## : SMS :

Pyar ke jaam ko aise na piyo ke adha piya aur adha chhod diya, yaaro yeh,pyar hai pyaar.. nahi koi VIMBAR jo thoda sa lagaya or bas hogaya...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.८ | २८.८ |
| अहमदनगर | ३९.१ | २९.२ |
| अकोला | ४३.३ | ३१.२ |
| अमरावती | ४३.१ | ३०.६ |
| बीड | ४८.६ | ३६.९ |
| भंडारा | ४७.१ | ३४.१ |
| बुलढाणा | ४०.९ | २५.६ |
| चंद्रपूर | ४९ | ३६.६ |
| चेन्नई | ४४.१ | ३३.७ |
| नवी दिल्ली | ४१.४ | २७.८ |
| धुळे | ४२.९ | २८.७ |
| गोंदिया | ४६.६ | ३२.८ |
| जळगाव | ४३.४ | ३०.९ |
| कोल्हापूर | ४१.४ | २५ |
| लातूर | ४०.३ | ३०.९ |
| मुंबई | ४१ | ३६ |
| नागपूर | ४५.२ | ३४ |
| नांदेड | ४३.४ | ३२.३ |
| नंदूरबार | ४१.५ | २८.६ |
| नाशिक | ३९.७ | २५.४ |
| पुणे | ३७.३ | २४.७ |
| पंढरपूर | ४१.१ | ३१.५ |
| सातारा | ४०.७ | २४.९ |
| सांगली | ४२.९ | २५.७ |
| सोलापूर | ४१.८ | ३०.४ |
| वर्धा | ४६.५ | ३४.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण साहसामुळे आपल्याला यश मिळेल. चोरी किंवा नुकसानीचे योग आहेत.

**तूळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व भावाचे सहकार्य मिळेल. बुद्धि आणि मनोबलाने मिळकतीत वाढ होऊ शकते.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व प्रसन्नता आणि आशाजनक वातावरणामुळे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम कष्टाने कामे साध्य होतील. विचार करुन कामे करणे फायद्याचे ठरेल.

**मिथून :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व कौटूंबिक जीवन सुखमय राहील. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीची भेट होईल.

**धनू :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : दक्षिण प्रयत्न आणि दुरदर्शीपणामुळे सहकार्य मिळेल. सहचरिणीची सन्मानात भर टाकेल.वाहन सुख मिळेल.

**कर्क :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापारात स्वत:च्या निर्णयाने कामे करा. स्थायी संपत्ती वाढविण्यात घाई करु नका.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम कष्टाच्या तुलनेत यश कमी मिळेल. व्यापारिक अडथळे येतील. धावपळ होईल.


**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण साहस, पराक्रमात वाढ होईल. नोकरीत बढतीचे योग आहेत. प्रकृती उत्तम राहील.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व थोडया प्रयत्नांनी लाभ मार्ग सुकर होईल. सामाजिक यश व सन्मान मिळेल.

**कन्या :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम सामाजिक उत्तरदायित्व पूर्ण कराल. कामात मनासारखा लाभ होईल.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व अधिकाऱ्यांच्या सन्मानास पात्र होऊ शकाल. आर्थिक कार्य पूर्ण झाल्याने आनंद होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९५३



**आडवे शब्द**

१. मुरळी
४. जुन्या जमान्यात न शिकलेल्या स्त्रियांनाही 'स्वंयसिद्धा' बनवणारे स्वयंपाकातील साथीदार
८. भांडण
९. बाण
१०. संतापी, रागीट
१२. पोत्याचे कापड
१३. पुरुष
१४. रम्य, रमणीय
१५. रांग
१६. भांबावलेला
१८. विद्येचे माहेरघर
१९. रत्न (हिंदी)
२१. रस्ता, मार्ग
२३. दात
२४. मोठा हातोडा
२५. टायर यापासून बनवतात
२७. कूपनलिका, आड यासाठी बोलीभाषेतील शब्द
२९. कांद्याची खमंग, चमचमीत, बटाट्याची छान कुरकुरीत!
३०. सिद्ध
३२. हार, सर
३३. नाशिकजवळील देवीचे तीर्थक्षेत्र
३४. स्वीकारलेले व्रत
३५. नम्र, वाकलेला
३६. पितळ्याच्या भांड्यांना आतून झळाळी आणणे
३७. थंड
३८. दोन आठवाड्याचा काळ
४०. श्रीफळ
४३. जादूटोणा
४४. गर्भाचे वेष्टण
४७. मावशीचा मुलगा
४९. जन्म
५०अ. वाळवंट
५१. माराची उमटलेली खूण
५२. गुजराथी दांडिया नृत्य
५५. सापाची एक जात
५७. शाहिरी गाणे
५८. झाडाभोवतीचा कट्टा
५९. परमेश्वर
६०. नवरा, पती
६२. रम्य, रामविणारे
६३. आकाश
६४. सारासार बुद्धी
६५. विश्व, दुनिया
६७. एका रेषेत
६९. वासर, दिन
७०. मुरुमाची जमीन
७२. अर्धी ओंजळ
७३. गेरु
७४. प्रत्यक्ष प्रमाण, आधार
७५. अवस्था, स्थिती
७७. बांबू
७८. सगळीकडे
७९. रसाळ
८०. रामाला बोरे देणारी

**उभे शब्द**

१. राष्ट्र
२. लाजणे, ओशाळणे
३. रावणाची घोडचूक
४. उदर
५. सरसरीत
६. टिंगल, टवाळी
७. लहर, तरंग, टूम
८. नामशेष
११. पुन्हा, माघारी
१३. मना, विरोध
१७. जिवाला लागलेला घोर
१८. प्राचीन, जुने
२०. मवाळ धोरण
२२. गोष्ट, कथा
२४. निवासस्थान
२६. ताकद, सामर्थ्य
२८. दक्ष, सतर्क
३०. वेदना
३१. वारंवार, नेहमी
३४. उंट हाकणारा
३४अ एकटा
३६. वेदनेने ओरडणे, हळहळणे
३८. कमळ
३९. आशीर्वाद
४१. विष्णूपत्नी
४२. पर्जन्य
४५. ज्ञानी, अनुभवी
४६. आश्चर्याची गोष्ट
४८. गवताची पेंढी
५०. नेत्रसुखद
५३. प्रस्थान, जाणे
५४. पोपटाच्या चोचीप्रमाणे असलेले नाक
५५. मनाला आलेला थकवा
५६. रात्रंदिवस
५८. विजार
६१. मानलेला मुलगा
६४. श्रीमंत
६६. गडावरील अधिकार, किल्लेदार
६७. बेचव, पचपचीत
६८. रसपूर्ण
७१. रमेचा परमेश्वर असा विष्णू
७५. औषध
७६. ऐट, थाट, दिमाख

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.बुडत्याचा पाय खोलात ६.करवत १०.कळ ११.बडबड १२.वाचाळ १३.भारत १४.लायक १६.रकाना १८.लाख २१.आस्था २२.मरगळ २४.काल २५.करंगळी २६.पान २७.वंग २८.वार २९.कमोद ३१.भात ३३.चाकर ३५.अथक ३७.कामगार ३८.निखारा ३९.आरसपान ४०.वारंवार ४१.मात्र ४२.गृहकलह ४५.रक्तचंदन ४८.देह ४९.हकनाक ५१.चर ५३.स्थलांतर ५६.विमल ५७.रमणी ५८.डर ५९.चकचकीत ६१.समान ६२.सगा ६३.शरम ६४.लवकर ६६.गर ६८.चलन ७१.यम ७२.कानाडोळा करणे ७४.रबडी ७५.नगर ७६.रजत

उभे उत्तर : १.बुडत्याला काडीचा आधार २.चाकरचुकर ३.पाळत ४.खोकला ५.तबक ६.कबरस्थान ७.रडका ८.तवा ९.हळहळणे १५.यदा १७.नामवंत १९.खल २०.जगन्नाथ २१.आपादमस्तक २३.रग २८.वारस ३०.मोका ३१.भारवाहक ३२.वखार ३४.कर ३५. अनमान ३६.कथा ३८.निवारक ४२.गृहस्थ ४३.लहर ४४.तंतोतंत ४६.चंचल ४७.दर ५०.नाभिकमल ५२.नमन ५४.लांडगा ५५.तर ५६.विद्यालय ५७.मामा ५९.चरचरीत ६०.कीर ६१.सरकार ६२.सरकणे ६५.वमन ६६.गळा ६७.कणेर ६९.नरम ७०.तिडीक ७३.डोके

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आदिवासी कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी वारली पेंटिंग कार्यशाळा

पुणे (दैनिक संध्या) : आदिवासी समाजातील वारली जमातीची चित्रकला ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, आकर्षक आणि अद्वितीय मानली जाते. वारली पेंटिंगने आज देशाच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या पारंपरिक कलेला अधिक प्रोत्साहन मिळावे आणि आदिवासी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने २१ मे २०२६ पर्यंत वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन यश रेजेंसी, ४१२-सी, के. एम. मुन्शी रोड, लक्ष्मी सोसायटी, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, पालघर तालुक्यातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील अनुसूचित जमातीतील वारली चित्रकार सहभागी झाले आहेत. ही कार्यशाळा केवळ चित्रकार आणि कलावंतांना प्रोत्साहन देणारी नसून उद्योजक, व्यावसायिक तसेच कला क्षेत्रातील गुंतवणूकदारांसाठीही उपयुक्त ठरणार आहे. व्यवसाय व उद्योगांच्या ब्रँडिंगसाठी वारली चित्रकलेचा प्रभावी वापर करता येऊ शकतो. उद्योजक, व्यावसायिक तसेच कलाप्रेमींनी या कार्यशाळेस भेट देऊन आदिवासी कलेला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मंजिरी मनोलकर, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी केले आहे.


### पुणे विभागाची स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर ; आचारसंहिता लागू

पुणे (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### कामगारांना 100 टक्के अनुदानावर पत्र्याचे स्टॉल; अर्जाची अंतिम मुदत 31 जुलै 2026

पुणे (दैनिक संध्या) : सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील चर्मकार व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांसाठी "पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना" राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत गटई काम करताना ऊन व पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल तसेच कमाल ५ हजार रुपये इतके अनुदान डीबीटीद्वारे देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्जदार अनुसूचित जाती अथवा नवबौद्ध प्रवर्गातील असून त्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शहरी भागासाठी १ लाख रुपये व ग्रामीण भागासाठी ८० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. अर्जदाराने स्टॉलसाठी मागितलेली जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिकेकडून अधिकृतरित्या भाडे, करार, खरेदी अथवा मोफत ताब्यात दिलेली असावी किंवा ती स्वमालकीची असावी. संबंधित जागेचा अर्जदाराच्या नावाचा चालू ७/१२ उताराही आवश्यक राहणार आहे. अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचा जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्वे नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे – ४११००६ येथे अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०६६११ वर संपर्क साधावा.

### बीएसएचने नवीन श्रेणी केली लाँच




■ ७ किलो ते १२ किलो क्षमतेमध्ये उपलब्ध; नवीन श्रेणीमध्ये स्मार्ट वैशिष्ट्ये आणि सुलभतेसाठी 'नेक्स्ट-जेन युजर इंटरफेस'चा समावेश

■ २०२६ पर्यंत टॉप लोड वाशिंग मशीन व्हॉल्यूम तिप्पट करण्याचे आणि मार्केट शेअर दुप्पट करण्याचे बीएसएच चे उद्दिष्ट

पुणे (दैनिक संध्या) : होम अप्लायन्सेस उद्योगातील जागतिक आघाडीची कंपनी बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड'ने आपल्या टॉप लोड वाशिंग मशीन विभागातील वाढीला गती देण्यासाठी नवीन श्रेणी लाँच केली आहे. कंपनीने ७ किलो ते १२ किलो क्षमतेच्या बॉश टॉप लोड वाशिंग मशीन वॉशिंग मशीन्ससह आपल्या पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. हा लॉन्च भारतातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या लॉन्ड्री विभागांपैकी एक असलेल्या टॉप लोड वॉशिंग मशीन सेगमेंटमध्ये बॉशच्या धोरणात्मक विस्ताराचे प्रतीक आहे. किफायतशीर ते प्रीमियम किंमत श्रेणीपर्यंत पसरलेल्या नव्या ऑटोमॅटिक टॉप लोड पोर्टफोलिओद्वारे, बॉश चे उद्दिष्ट या श्रेणीचा स्वीकार अधिक वेगाने वाढवणे तसेच उच्च-वॉल्यूम टॉप लोड वाशिंग मशीन बाजारातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करणे आहे. उद्योग अहवालांनुसार, सोयीसुविधा, प्रीमियम अनुभव आणि स्मार्ट फीचर्सकडे वाढता कल टॉप लोड वाशिंग मशीनच्या स्वीकाराला वेग देत आहे. अधिक सक्षम पोर्टफोलिओ, प्रगत तंत्रज्ञान आणि विविध किंमत श्रेणींमध्ये वाढलेली उपलब्धता यांच्या जोरावर, बीएसएच भारतातील टॉप लोड वाशिंग मशीन सेगमेंटमधील पुढील वाढीच्या टप्प्यावर आक्रमकपणे भक्कम पकड निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. भारतामधील बीएसएचच्या लॉन्ड्री व्यवसायाला मिळत असलेल्या मजबूत गतीच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार करण्यात आला आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत, बॉश ने ऑटोमॅटिक टॉप लोड विभागात मागील वर्षाच्या तुलनेत दमदार दुहेरी अंकातील वाढ नोंदवली. याचबरोबर, सर्व विक्री चॅनेल्समधून मिळालेल्या मजबूत प्रतिसादामुळे एकूण लॉन्ड्री व्यवसायातही तब्बल ५० टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवण्यात आली. लाँचच्या निमित्ताने बोलताना बीएसएच होम अप्लायन्सेसचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सैफ खान म्हणाले, "भारतातील लाँड्री श्रेणी वेगाने विकसित होत आहे आणि बीएसएच होम अप्लायन्सेस एक भक्कम आणि अधिक संतुलित पोर्टफोलिओसह या बदलाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहे.

# पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी

## प्रथम पुरस्कार दिवंगत अजित पवार यांच्या नावाने देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे (दै. संध्या)

■ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव



शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-२०२६'च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर , हेमंत रासने,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. यंदाच्या स्पर्धेसाठी तब्बल १ हजार २९० अर्ज प्राप्त झाले असून विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या वर्षीच्या स्पर्धेतील चार संशोधन प्रकल्पांचे उत्पादन प्रत्यक्षात सुरू झाले असून आणखी १२ उत्पादने लवकरच बाजारात येणार आहेत.

या स्पर्धेतून केवळ कल्पना मांडल्या जात नाहीत, तर त्या प्रत्यक्ष उत्पादनात उतरून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. यंदाच्या स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही श्री. फडणवीस यांनी दिली.

प्रदर्शनात शेतीतील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापराबाबत उपयुक्त नवकल्पना आहेत. उपग्रह नकाशांकन आणि मृदा परीक्षणाच्या आधारे जमिनीचे अचूक विश्लेषण करणारे नमुने, शेताच्या रचनेनुसार ओलावा व्यवस्थापन करून आवश्यक तेवढाच पाणीपुरवठा करणारी यंत्रणा, तसेच तण आणि पीक ओळखून स्वतंत्र फवारणी करणारे तंत्रज्ञान अशा विविध संकल्पनांचे मुख्यमंत्री यांनी विशेष कौतुक केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असून भविष्यात त्याची अचूकता आणखी वाढेल. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मानवरहित यंत्रे आणि उपग्रह नकाशांकनाच्या माध्यमातून अचूक अहवाल तयार करणारे तंत्रही उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, बदलते हवामान, पाण्याची कमतरता, खतांची टंचाई, मजुरांची कमतरता आणि बाजारभावातील चढ-उतार या विविध आव्हानांना सामोरे जाताना कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. नवोपक्रमांना चालना देण्यासाठी आणि जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रदर्शनाची पाहणी

पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. प्रत्येक स्टॉलवर थांबून त्यांनी संशोधकांशी आणि युवा उद्योजकांशी थेट संवाद साधत त्यांच्या संकल्पना समजून घेतल्या आणि त्यांच्या संशोधनाचे कौतुक करीत प्रोत्साहनही दिले. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना, स्मार्ट सिंचन प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, स्वयंचलित उपकरणे तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध संशोधनात्मक प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्सुकतेने माहिती घेतली. प्रकल्प सादर करणाऱ्या तरुणांच्या कल्पकतेचे त्यांनी कौतुक करत कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोठे परिवर्तन घडवून आणण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी त्यांनी विविध उपकरणांची कार्यपद्धती समजून घेत संशोधकांना प्रोत्साहनपर प्रश्न विचारले. अनेक स्टॉलवरील संशोधन प्रत्यक्ष पाहून त्यांनी अशा उपक्रमांमधून राज्यातील युवकांना नवसंशोधनासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे अधोरेखित केले.

## ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद





पुणे (दै. संध्या)

बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) दि. 20 मे 2026 रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली आहे. देशभरातील सुमारे 12.50 लाख औषध विक्रेते या बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे अध्यक्ष संदीप पारख यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संघटनेचे पुणे सेक्रेटरी अनिल बेलकर, खजिनदार रोहित करपे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. अधिक माहिती देताना पारख म्हणाले, औषध व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act 1940 आणि Rule 1945 अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसताना देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. याविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली असतानाही सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कोरोना काळात औषधांची होम डिलिव्हरी करण्यासाठी सरकारने तात्पुरती सूट दिली होती. मात्र महामारी संपल्यानंतरही ती मागे घेण्यात आलेली नाही. या परिस्थितीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या मोठ्या प्रमाणात सवलती देत बाजारपेठ ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. यामुळे लहान औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात आले असून ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्थेवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. Drug Price Control Order (DPCO) 2013 अंतर्गत औषध विक्रेत्यांसाठी निश्चित नफा मर्यादा ठेवण्यात आली आहे. मात्र कॉर्पोरेट कंपन्या 20 ते 50 टक्क्यांपर्यंत सवलत देत असल्याने पारंपरिक औषध विक्रेते स्पर्धेत टिकू शकत नसल्याचे जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच डॉक्टरांनी लिहिलेल्या औषधांच्या पर्यायी ब्रँड देण्याचा अधिकार औषध विक्रेत्यांना द्यावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे.

## प्रार्थना हा आत्म्याचा नैवेद्य आहे : प्रा. जोशी

पुणे (दै. संध्या)



प्रार्थनेची व्याप्ती आत्मकल्याणा पासून विश्व कल्याणापर्यंत आहे. अंतरंग समृद्ध करणे आणि आत्म प्रभुत्वाची दारे उघडणे हाच प्रार्थनेचा उद्देश्य आहे. प्रार्थना हा आत्म्याचा नैवेद्य आहे. असे मत प्रसिद्ध लेखक,वक्ते व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी कार्याध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी (अध्यक्ष)यांनी व्यक्त केले.मिहाना पब्लिकेशन्सने प्रकाशित केलेल्या व ज्येष्ठ साहित्यिकसूर्यकान्त द.वैद्य यांनी लिहिलेल्या "प्रार्थना" या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते व संसद रत्न खासदार प्रा. डॉ.मेधाताई कुलकर्णी(प्रमुख पाहुण्या) यांच्या उपस्थितीत उद्यानप्रसाद कार्यालय येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रा. मिलिंद जोशी, खासदार डॉ.मेधाताई कुलकर्णी , सूर्यकान्त द. वैद्य सुहास शाळीग्राम,अमृता कुलकर्णी,साहित्यिक , आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले "व्यक्ती ते समष्टी असा प्रार्थनेचा परीघ आहे.मनातील विचार आणि विकार दूर करून विवेक जागा करण्याचे सामर्थ्य प्रार्थनेत आहे. मनाचे शुद्धीकरण प्रार्थनेमुळे होते. "

लेखकाचे मनोगत व्यक्त करतांना सू. द.वैद्य म्हणाले "बालपणापासूनच्या संस्कारांनी कवितेची आवड मनात रुजली आणि महाविद्यालयीन काळात ती अधिक फुलत गेली. गुरूजनांचे मार्गदर्शन, साहित्यिक मित्रांचा सहवास आणि अध्यापनाचा अनुभव यामुळे माझे व्यक्तिमत्त्व घडत गेले. ग्रामीण भागात थांबलेले लिखाण विशेषतः सुहास शाळिग्राम आणि त्यांच्या वर्गमित्रांनी दिलेल्या प्रेरणेने सुरु झाले. त्यातून 'सूर्यफुले' आणि 'सूर्यकिरण' हे संग्रह प्रकाशित झाले. शिक्षक आणि विद्यार्थी हे एकमेकांना घडवत असतात. माझ्यातील सर्जनशीलता पुन्हा जागवण्याचे काम माझ्या विद्यार्थ्यांनी केले."

शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत सुहास शाळीग्राम म्हणाले " वैद्य सरांनी विद्यार्थ्यांना केवळ कविता शिकवली नाही, तर कवितेकडे पाहण्याची दृष्टी दिली. नव्वदीतही त्यांची लेखणी तितक्याच उत्साहाने सक्रिय असून 'प्रार्थना' हा संग्रह त्यांच्या परिपक्व चिंतनाचा आणि समाजाशी असलेल्या सखोल बांधिलकीचा प्रत्यय देणारा आहे. विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे शिक्षक आणि संवेदनशील कवी म्हणून त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे."

खा .मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "प्रार्थना या कविता संग्रहातील कविता सामाजिक जाणीव, अध्यात्मिक चिंतन आणि मानवी मूल्यांचा विशेष उल्लेख अशा प्रकारच्या आहेत.त्यांनी केला. सध्याच्या काळात मराठी शुद्धलेखनाकडे दुर्लक्ष होताना दिसते, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने भाषेच्या शुद्धतेची जबाबदारी अधिक वाढली आहे. शुद्ध भाषा, उत्तम लिखाण आणि संवेदनशील वाचक यांच्यामुळे मराठी संस्कृती अधिक समृद्ध होईल.आई,बाबा आणि मातृभाषा या शब्दामधील आत्मीयता जपण्यासाठी मराठी पुस्तकांची निर्मिती आणि वाचन संस्कृती वाढवणे हि काळाची गरज आहे."

मिहाना पब्लिकेशन्सच्या अमृता कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गीत गझलकार सुधीर कुबेर यांनी केले तर महेंद्र वैद्य यांनी आभार प्रदर्शन केले.

## साथी पोर्टल : बियाण्यांच्या पारदर्शकता, गुणवत्ता व विश्वासार्हतेकडे डिजिटल पाऊल

आपल्या देशात बियाण्यांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर होतो. विविध प्रकारचे तृणधान्ये, कडधान्ये, कापूस, सोयाबीन, भाजीपाला अशा प्रत्येक पिकांसाठी दरवर्षी प्रचंड प्रमाणावर बियाण्यांची देवाण-घेवाण होते. परंतु या मोठ्या व्यवहारामध्ये पारदर्शकतेचा अभाव होता. अनेकदा शेतकऱ्यांना कोणते बियाणे अधिकृत कंपनीचे आहे आणि कोणते बनावट आहे, कळण्यास अडचण निर्माण होत होती. बियाण्यांची पिशवी घेतल्यानंतर त्यामध्ये अपेक्षित गुणधर्म असतीलच याची हमी नसायची, परिणामी उत्पादन घटायचे व शेतकऱ्याचा खर्च वाया जायचा. शासनालाही बियाण्यांच्या उपलब्धतेची अचूक आकडेवारी मिळत नसे. एका जिल्ह्यात बियाण्यांचा तुटवडा असताना दुसऱ्या जिल्ह्यात साठा पडून राहायचा. या सगळ्या अडचणींवर उपाय म्हणून साथी पोर्टलची निर्मिती करण्यात आली.

शेतकऱ्यांना वेळेवर, गुणवत्तापूर्ण आणि खात्रीशीर बियाणे मिळणे हे अन्नसुरक्षेसाठी आणि कृषी उत्पादनक्षमतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. उत्तम गुणवत्तेच्या जनुकीयदृष्ट्या सुधारित बियाणांमुळे पीक उत्पादनात २० टक्क्यापर्यंत वाढ होऊ शकते. परंतु बहुतेक वेळी बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांचा पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या सहकार्याने Seed Authentication, Traceability and Holistic Inventory म्हणजेच साथी पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलची अंमलबजावणी सन 2023 पासून टप्याटप्याने करण्यात आली असून 25 एप्रिल 2025 पासून सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवर कार्यान्वित करण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे.

साथी पोर्टल केवळ माहिती व्यवस्थापनासाठी नसून शेतकऱ्यांपासून ते शासनापर्यंत सर्व घटकांना जोडणारे, पारदर्शकता वाढवणारे आणि बियाण्यांच्या गुणवत्तेचे रक्षण करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे. साथी पोर्टल हे एक डिजिटल आरसा आहे, ज्यामध्ये बियाण्याचा प्रवास स्पष्टपणे दिसतो. हे पोर्टल बियाणांच्या संपूर्ण प्रवासाची नोंद ठेवते. साथी प्रणालीनिर्मित सांकेतांक क्रमांकामुळे (क्युआर कोड) बियाण्याच्या उत्पादनाचा स्वतंत्र इतिहास शेतकऱ्याला सहज तपासता येतो. यामुळे ट्रेसिबिलिटी, पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण आणि कायदेशीर पालन सुनिश्चित होते.

बियाणे उत्पादक व वितरकांसाठी साथी पोर्टलची उपयुक्तता : पारदर्शकता आणि शेतकऱ्यांमध्ये विश्वासार्हता वाढवते. बनावट, कालबाह्य व अनधिकृत बियाण्यांवर नियंत्रण ठेवणे, व्यवसाय सुलभता आणि व्यवस्थापन, कायदेशीर बाबींचे पालन करणे सुलभ, खर्चात व वेळेत बचत होण्यासह विक्री आणि वितरणावरील नियंत्रण, एकत्रित डेटा बँक तयार होते. तसेच वितरण साखळीचा ट्रॅक ठेऊन नियोजन शक्य, शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तात्काळ उपाययोजना शक्य, एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व व्यवहार, राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेटवर्किंग, संस्थेचा ब्रँड व व्यवसाय दोन्ही वाढण्यास मदत होते.

बियाणे विक्रेत्यांनी https://seedtrace.gov.in/ या पोर्टलवर लॉगिन करावे. संकेतस्थळावर प्रवेश केल्यानंतर 'महाराष्ट्र राज्य' निवडावे. त्यानंतर लॉगिन आयडी व पासवर्ड प्रविष्ट करून, कॅप्चा कोड टाकावा व लॉगिन करावे. प्रथमच लॉगिन केल्यानंतर वापरकर्त्यांनी सर्वप्रथम आपली प्रोफाईल अद्ययावत करावी. या पोर्टलवर खरेदीदारांचे विक्रेते, शासकीय संस्था आणि शेतकरी असे तीन प्रकार उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांना बियाणे विक्री करतांना फार्मर आयडी नमूद करावा. फार्मर आयडी नमूद उपलब्ध नसल्यास शेतकऱ्याचे पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. त्यानंतर साठा निवड व बियाणे विक्रीसाठी विक्रेते, शासकीय संस्थेच्या बियाणे विक्री कार्यपद्धतीचा अवलंब करुन शेतकऱ्यांना बियाणे विक्री करावे.

राज्यातील बियाणे उत्पादक तसेच विक्रेत्यांच्या संघटनांचे (सियाम, मासा व माफदा) सूचनांनुसार साथी पोर्टलमध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये लॉट-निहाय ट्रॅकिंग प्रणालीची अंमलबजावणी, प्रत्येक बियाणे बॅग स्वतंत्र स्कॅन करण्याची आवश्यकता नसलेली सुलभ विक्री प्रक्रिया, ईआरपी प्रणाली (उदा. टॅली) सोबत एकत्रीकरण, ॲग्रीस्टॅक एपीआयद्वारे फार्मर आयडी आधारित माहितीची स्वयंचलित उपलब्धता, बाह्य सॉफ्टवेअर वापरणाऱ्यांसाठी बिलिंग प्रक्रिया अकार्यान्वित करण्याची सुविधा, "SATHI-SaleEasy" मोबाईल ॲपद्वारे सुलभ विक्री नोंद, तसेच बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ अंतर्गत फॉर्म "D" सादरीकरणाची सुविधा यांचा समावेश आहे. याशिवाय, बियाणे साठा परतावा प्रक्रियेतही संघटनेच्या सहमतीनेच आवश्यक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

डॉ. प्रीती सवाईराम ,कृषी उपसंचालक (बियाणे ),कृषी आयुक्तालय: "योग्य बियाणे – योग्य वेळी – योग्य शेतकऱ्यापर्यंत" हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी समन्वय, पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक असून त्याद्वारे राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून देत उत्पादनक्षमता वाढविणे शक्य होईल. "

## थोडक्यात पण महत्वाचे...




### कर्करोग जनजागृतीसाठी पुण्यात रंगणार 'वीरा मिस अँड मिसेस महाराष्ट्र' फॅशन शो

पुणे (दैनिक संध्या) : वीरा मिस अँड मिसेस महाराष्ट्र आणि द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत कर्करोग जनजागृती तसेच कर्करोगाशी झुंज देणाऱ्या रणरागिणी महिलांना समर्पित असलेला हा विशेष उपक्रम पुण्यात मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. या पत्रकार परिषदेत आयोजकांनी शोची संकल्पना, उद्दिष्टे आणि कार्यक्रमाची रूपरेषा याविषयी माहिती दिली. ३० आणि ३१ मे रोजी ग्रँड तमन्ना हॉटेल, फेज २, हिंजवडी येथे हा भव्य फॅशन शो मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजक डॉ. अंजली आवटे आणि रामकुमार शेडगे यांनी दिली. फॅशन, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम घडवणारा हा शो महिलांच्या संघर्षाला सलाम करणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कर्करोगाबाबत जनजागृती निर्माण करण्यासोबतच कर्करोगाशी लढणाऱ्या महिलांच्या जिद्दीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पत्रकार परिषदेला प्रसिद्ध मॉडेल व स्किनतज्ञ डॉ. अंजली आवटे, डॉ. संदीप आवटे, चित्रपट लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे, पायल प्रामाणिक, डॉ. प्रीती गुप्ते, डॉ. प्रतिभा लबडे, डॉ. जबीन पठाण, सारिका बोऱ्हाडे, डॉ. अश्विनी नवले, नितीन झगरे, आकाश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. या शो बद्दल पुणेकरांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून हा फॅशन शो सामाजिक संदेश देणारा वेगळा उपक्रम ठरणार असल्याची चर्चा आहे.

### हनुमान प्रासादिक दिंडी सोहळ्याची नूतन कार्यकारिणी जाहीर



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील वाघजाईनगर परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या हनुमान प्रासादिक दिंडी सोहळ्याची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये अध्यक्षपदी नागेश अशोक शेलार यांची, तर उपाध्यक्षपदी विठ्ठल दत्तात्रय बिरदवडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडी बिनविरोध झाल्यामुळे परिसरातील भाविक, नागरिक आणि तरुण कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हनुमान प्रासादिक दिंडी सोहळा हा वाघजाईनगर परिसरातील श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्य जपणारा मानला जातो. दरवर्षी मोठ्या भक्तिमय वातावरणात हा सोहळा साजरा केला जातो. विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, दिंडी आणि सामाजिक उपक्रमांचे या सोहळ्यामध्ये आयोजन करण्यात येते. नवनिर्वाचित अध्यक्ष नागेश शेलार व विठ्ठल बिरदवडे यांनी सांगितले की," सर्व ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्याने यंदाचा दिंडी सोहळा अधिक भव्य, दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. सर्वांच्या विश्वासाला पात्र ठरत धार्मिक आणि सामाजिक कार्याला प्राधान्य दिले जाईल." खेड तालुक्यातील नागरिकांनी नव्या कार्यकारिणीकडून यंदाचा दिंडी सोहळा अधिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### शिवउद्योग सहकार सेनेच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी प्रशांत तुळवे



चाकण (दैनिक संध्या) : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसेनेशी संलग्नित असलेल्या शिवउद्योग सहकार सेनेच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी येथील उद्योजक प्रशांत तुळवे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. रामदास धनवटे यांची शिवसेनेच्या पुणे जिल्हा प्रमुख पदी, जिल्हा सचिवपदी नविद मगदूम, खेड तालुका अध्यक्षपदी नीलेश नितनवरे यांची निवड झाली आहे. या नियुक्तीमुळे पुणे जिल्ह्यातील पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले असून, शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघाच्या वतीने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवभक्त हर्षद नेगिनहाल यांच्या सूचनेनुसार व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उदय भोसले, प्रदेश कार्याध्यक्ष एहतेशाम पेनवाला, सरचिटणीस सतीश चिटणीस आणि राष्ट्रीय सरचिटणीस सतीश नायर यांच्या सहकार्याने ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली. प्रशांत तुळवे यांनी सांगितले की," पदाच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे करून बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणार आहे."

# विकसित भारत ध्येय साध्य करण्यासाठी संशोधनाला महत्त्व

## डॉ. हर्षवर्धन पोल : क्षितिज अंतर्गत पीसीसीओई येथे पेटंट अनुकूल नवकल्पनांचे प्रदर्शन

**उद्योग आणि शैक्षणिक संस्था संबंध दृढ करण्यासाठी पीसीसीओईचा पुढाकार**



पिंपरी, पुणे (दै. संध्या) :

"२०४७ विकसित भारत" हे ध्येय साध्य करण्यासाठी आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधनाला खूप महत्त्व आहे. त्यासाठी भारतीय अभियंत्यांनी संशोधन क्षेत्रात प्रयत्नपूर्वक आंतर विद्याशाखीय सहकार्याने स्वदेशी नवोपक्रम राबविले पाहिजेत असे आवाहन सीएसआयआर राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. हर्षवर्धन पोल यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'क्षितिज २०२६' अंतर्गत पाचव्या 'इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट शोकेस कॉन्फरन्स'चे उद्घाटन डॉ. पोल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीसीओईचे उप संचालक डॉ. निळकंठ चोपडे, डसॉल्ट सिस्टीम कंपनीचे आकृती ग्लोबल कोअर टीम लीडर अनिकेत भांगे, क्षितिज २०२६ चे संयोजक डॉ. राहुल गुजर, डॉ. श्रीनिवास अंबाला, समन्वयक डॉ. रजनी पि. के. आदींसह राज्यभरातील नामांकित कंपनीमधील १५५ उद्योजक प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी सहभागी संशोधकांनी नाविन्यपूर्ण उद्योगाभिमुख पेटंट योग्य २६ प्रकल्पाचे सादरीकरण केले. यामध्ये मशीन लर्निंग, डेटा सायन्स, स्ट्रक्चरल हेल्थ, सस्टेनेबल एन्व्हायर्नमेंट, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन, हेल्थकेअर, सिस्टीम इंजिनिअरिंग आणि स्मार्ट चिप यांसारख्या आंतरविद्याशाखीय क्षेत्रांचा समावेश होता.

पीसीईटी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डसॉल्ट सिस्टीम कंपनीचे ग्लोबल टीम लीडर अनिकेत भांगे यांनी सांगितले की, संशोधनातून आलेली कोणतीही नवकल्पना ही प्रतिकूल नसते, तिची अंमलबजावणी तसेच तिचे आवश्यक आणि परिणामकारक उत्पादनांमध्ये रूपांतर होणे महत्त्वाचे असते. त्यासाठी क्षितिज २०२६ हे उपयोजित अभियांत्रिकी, वास्तविक समस्यांचे निराकरण आणि शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी एक गतिमान व्यासपीठ ठरले आहे. यामुळे उद्योग प्रतिनिधींच्या सहभागातून उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य अधिक मजबूत होईल.

स्वागत डॉ. रजनी पि. के., सूत्र संचालन डॉ. राहुल गुजर आणि आभार डॉ. श्रीनिवास अंबाला यांनी मानले.

# ३० जूनपर्यंत मालमत्ता करावर विविध सवलती

**१ लाख ६५ हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ**

पिंपरी (दै. संध्या) :

> महापालिकेच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी ३० जूनपूर्वी मालमत्ता कराचा भरणा करावा. ऑनलाईन पद्धतीने कर भरल्यास १० टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ मिळत आहे. तसेच महिलांच्या नावावरील निवासी मालमत्तांसाठी विशेष सवलत उपलब्ध आहे. थकीत कर असलेल्या मालमत्ताधारकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी तातडीने कर भरावा. नागरिकांनी वेळेत कर भरल्यास शहर विकासाच्या विविध प्रकल्पांना गती मिळण्यास मदत होईल.
>
> **— सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने शहरातील मालमत्ताधारकांसाठी मालमत्ता कर भरण्यावर विविध सवलती जाहीर करण्यात आल्या असून, नागरिकांनी या सवलतींचा लाभ घेत वेळेत मालमत्ता कराचा भरणा करावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे. ३० जून २०२६ पर्यंत संपूर्ण कराचा ऑनलाईन भरणा करणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असून, कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेला ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलतीचा लाभ देण्यात येत आहे. महापालिकेच्या कर संकलन मोहिमेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल १ लाख ८२ हजार ३३५ मालमत्ताधारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. महापालिकेने नागरिकांना घरबसल्या सुलभ पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे ऑनलाइन भरण्याकडे कल वाढत असल्याचे दिसून येत आहे. महापालिकेकडून चालू आर्थिक वर्षातील कर संकलनासोबतच थकीत कर वसुलीवरही विशेष भर देण्यात येत आहे. शहरातील मालमत्ताधारकांना कर भरण्याबाबत वेळेत माहिती मिळावी, यासाठी आतापर्यंत ६ लाख ६५ हजार ४७० मालमत्तांचे कर बिल वाटप करण्यात आले आहे. याशिवाय थकीत कर न भरलेल्या मालमत्ताधारकांविरोधात कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ३४ हजार १०८ थकबाकीदारांना जप्तीपूर्वीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत १ लाख ८२ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला असून विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. यामुळे महापालिकेच्या तिजोरीत आतापर्यंत १८३ कोटी १४ लाख रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला आहे. यामध्ये १० टक्के ऑनलाइन सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या जवळपास १ लाख ६५ हजार ४२४ इतकी असून, त्यांनी भरलेल्या मालमत्ता करातून १६९ कोटी ५० लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ऑनलाईन कर भरणा प्रणालीमुळे नागरिकांचा वेळ वाचत असून, पारदर्शक व सोयीस्कर पद्धतीने कर भरण्यास प्रोत्साहन मिळत असल्याचे महापालिकेच्या कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे.

> पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात नागरिकांनी भरलेला मालमत्ता कर हा अत्यंत महत्त्वाचा वाटा उचलतो. याच निधीतून शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि इतर नागरी सुविधा अधिक सक्षम करण्याचे काम केले जाते. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेने दिलेल्या सवलतींचा लाभ घेत वेळेत मालमत्ता कर भरावा आणि शहर विकासात आपला सहभाग नोंदवावा.
>
> **— डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# जासई येथे पावसामुळे येतो महापुर

उरण (दै. संध्या) :

उरण तालुक्यातील नॅशनल हायवे प्रशासनाला वारंवार पत्र व्यवहार करून पावसाळा सुरु होण्या आधी नाले सफाई करावी अशी मागणी केली आसता नॅशनल हायवे प्रशासन या कडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. वारंवार पत्र व्यवहार करून व प्रत्यक्ष कार्यालयाला भेटी देवून सुध्दा नॅशनल हायवे प्रशासन आजूनही झोपेचे सोंग केल्याचे नाटक करत आहे. ब-याच वेळेला जासई लगत आसलेले नॅशनल हायवे येथे पावसाळ्या मध्ये पाणी भरून ४ महिने येण्याजाण्याचा मार्ग बंद आसतो हे नॅशनल हायवे प्रशासनाला माहित असून तेथिल अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात व नागरीकांना वेठीस धरण्याचे काम करतात. दिनांक १८/०५/२०२६ रोजी सरपंच या नात्याने त्यांनी कार्यालयाला भेट दिली आसता असे निर्दशनास आले की नॅशनल हायवे प्रशासनाने नाले सफाई करण्याकरीता आजूनही कोणताही कॉन्ट्रक्टर नेमला नाही त्यामुळे येणा-या पावसाळ्यामध्ये नॅशनल हायवेच्या रस्त्यांवर नदिचे स्वरूप प्राप्त होणार आहे. त्यामुळे जासई गावातील नागरीकांसाठी नॅशनल हायवे प्रशासनाने बोटीची व्यवस्था करावी अशी मागणी सरपंच संतोष घरत यांनी नॅशनल हायवे प्रशासनाकडे केली आहे.गेल्या वर्षी रस्त्यावर व नाले गटारे मध्ये भरपूर प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने अनेक ग्रामस्थांचे टू व्हीलर, फोर व्हीलर वाहनांचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.तर अनेक दुकान व घरात पाणी गेल्याने मोठे नुकसान झाले होते.गेल्या वर्षी सारखी परिस्थिती पुन्हा उदभवू नये यासाठी त्वरित उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. नॅशनल हायवे प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून देखील वेळेत गटारे साफ होत नसल्याने नागरिकांना, जनतेला विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यंदाही साफसफाई न झाल्याने अनेक समस्या निर्माण होणार आहेत. त्यामुळे नॅशनल हायवे प्रशासनाने त्वरित नाले साफसफाई करावी व नागरिकांना दिलासा द्यावा.

# येवलेवाडीत नोकरांनी लांबवले २७ लाखांचे दागिने





पुणे (दै. संध्या) :

कोंढवा बुद्रुक-येवलेवाडी परिसरातील एका बंगल्यात घरकाम करणाऱ्या नोकरांनीच मालकाचा विश्वासघात करून कपाटातील २७ लाख २० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेली. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने (वय ६५, रा. कात्रज-कोंढवा रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी कृष्णबहादूर चंद (वय २५) आणि सिता ऊर्फ दुर्गा कृष्ण चंद (वय २३) या दोघा संशयितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी फिर्यादी महिलेची नजर चुकवून कपाटातील २७० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली. हा प्रकार १७ मे रोजी उघडकीस आल्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली.

# ९६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एमबँकेची विक्रमी कामगिरी

**शून्य एनपीए, ₹७०० कोटींहून अधिक ठेवी; ₹११०० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार**

पुणे (दै. संध्या) :



महाराष्ट्रातील विश्वासार्ह नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या एमबँक अर्थात द मुस्लिम सहकारी बँक लिमिटेड, पुणे यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे. बँकेने यंदा प्रथमच ₹७०० कोटींहून अधिक ठेवींचा टप्पा पार करताना ₹११०० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून शून्य एनपीए राखण्यातही यश मिळवले आहे.

बँकेने दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एमबँकेने ९६ वर्षांतील सर्वाधिक नफा नोंदवला असून मजबूत बॅलन्स शीट कायम राखली आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल सेवांचा विस्तार आणि ग्राहकांना अधिक जलद व सुलभ बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या धोरणामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे सांगण्यात आले.

एमबँकेचे अध्यक्ष तन्वीर इनामदार म्हणाले, "९६ वर्षांच्या प्रवासात ग्राहक, शेअरधारक, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी आम्हाला दिलेला विश्वास अमूल्य आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आम्ही सर्वोत्तम कामगिरी करू शकलो. या यशासाठी मी सर्वांचा मनापासून ऋणी आहे."

आज एमबँक एकाच कुटुंबातील अनेक पिढ्यांना सेवा देत असून ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करण्यात बँकेला यश आले आहे. आधुनिक डिजिटल सुविधा आणि ग्राहककेंद्रित दृष्टिकोन यांच्या मदतीने परंपरा आणि आधुनिकतेचा समतोल राखण्यात बँकेने विशेष यश मिळवले आहे.

१९३१ मध्ये स्थापन झालेली एमबँक ही पुणे मुख्यालय असलेली सहकारी बँक असून डिजिटल बँकिंग, कर्ज, ठेवी आणि विविध आर्थिक सेवा पुरविण्यावर तिचा भर आहे. व्यक्ती तसेच व्यवसायांसाठी सुलभ, तंत्रज्ञानाधारित आणि ग्राहकाभिमुख सेवा देण्याचे काम बँकेमार्फत केले जाते.

# कांदा उत्पादकांना २००० रुपये प्रतिक्विंटल दर द्या

पुणे (संध्या)




केंद्र सरकारच्या कांदा, साखर व इतर शेतीमालावरील दीर्घकालीन निर्यातबंदी धोरणामुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचला असून, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने किमान २००० रुपये प्रतिक्विंटल खरेदी दर द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. ही मागणी मान्य न झाल्यास काँग्रेसतर्फे राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

सासवड येथील जयप्रकाश चौकात "पुरंदर तालुका काँग्रेस कमिटी" आणि "पुणे जिल्हा काँग्रेस"तर्फे कांदा उत्पादक शेतकरी, नीट परीक्षा पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या निषेधार्थ आयोजित आंदोलनात ते बोलत होते.

गोपाळदादा तिवारी म्हणाले की, केंद्र सरकारच्या वारंवार होणाऱ्या कांदा व साखर निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. सरकारच्या लहरी आणि आडमुठ्या धोरणांमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आखाती देशांमधील हक्काची बाजारपेठ गमावली आहे. तसेच निवडणुकीपूर्वी शेतमाल हमीभावाबाबत दिलेली आश्वासने सरकारने तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी वक्त्यांनी नीट प्रवेश परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ आणि पेपरफुटी प्रकरणावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. शिक्षणाचे व्यापारीकरण करून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप करत, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांबद्दलही संताप व्यक्त करण्यात आला.

आंदोलनात पुणे जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीरंग चव्हाण, पुरंदर तालुका काँग्रेस अध्यक्ष साहेबराव फडतरे, महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेस उपाध्यक्ष प्रा. सचिन विमल, रामचंद्र दुर्गाडे, दत्ताशेठ झुरुंगे, गणेश ढोणे, प्रदीप पोमण, माऊली भोराडे, जिल्हा कार्याध्यक्ष लहुआण्णा निंवगुणे, ओबीसी अध्यक्ष राजेंद्र बरकडे, युवक अध्यक्ष उमेश पवार, बापू मोकाशी, बाळासाहेब कड, संदीप भोसले, युथ काँग्रेसचे ऋषीकेश जगताप, अतिश जगताप, राजन पवार आदी उपस्थित होते.

आंदोलनाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन दुर्गाडे यांनी केले. यावेळी भोर–पुरंदर परिसरातील संतप्त शेतकऱ्यांनी रस्त्यावर कांदा फेकून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदविला.


तळेगाव दाभाडे नगर परिषद | बहुजन हिताय | बहुजन सुखाय |

## तळेगाव दाभाडे नगर परिषद

तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे

दूरध्वनी क्र : १८००-२३३-२७३४

ई-मेल : talegaondabhademc@gmail.com

संकेतस्थळ : www.talegaondabhademc.org

WhatsApp क्र.: ९८९०६१६०८९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पा. पु. - ८ जा.क्र./२१६१/२०२६ — दिनांक :-१८/०५/२०२६

**ई- निविदा सुचना**

**तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता. मावळ, जि. पुणे**

तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि.पुणे यांचेकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून बी १ नमुन्यातील टेंडर पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदा फॉर्मच्या कोऱ्या निविदा विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण तपशिलासह दि. २०/०५/२०२६ ते दि. २७/०५/२०२६ पर्यंत पहावयास मिळतील.

कोणतीही एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेस राहील. तसेच ई-निविदा प्रणालीबाबत काही शंका असल्यास खालील फोन नंबरवर संपर्क साधावा दुरध्वणी क्र. ०२११४-२२२४४९

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम रुपये | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | तळेगाव दाभाडे नगरपरिषद येथील पाणीपट्टी विभागाकडील Metered पाणीपट्टी बिलांची मीटर रीडींग स्वतःच्या साहित्याने घेणे, त्याची डाटा एन्ट्री करणे, नॉन मीटर, मीटर पाणीपट्टी बिल तयार करणे तसेच पाणीपट्टी बिले वाटप कारणे व त्या अनुषंगाने पाणीपट्टी विषयक येणारी इतर कामे करणे. | ४०,०००/- | ५९०/- | १ वर्ष |

शिक्का

सही/-
(गिरीष दापकेकर)
मुख्याधिकारी
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि.पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आरक्षण उपवर्गीकरण बाबत अस्वस्थता शासन दरबारी मांडू - आण्णा बनसोडे

■ उपवर्गीकरणात कोणत्याही घटकांवर अन्याय होऊ देणार नाही – आण्णा बनसोडे

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण प्रक्रियेविरोधात राज्यभरात अनुसूचित जाती समाजामध्ये निर्माण झालेली अस्वस्थता शासन दरबारी मांडू. कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही यासाठी आपण कटिबद्ध असून लवकरच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन समाजाच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवणार आहोत असे महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सांगितले. रविवारी पिंपरी येथे महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीच्या शिष्टमंडळाचे प्रमुख राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली गंगाताई धेंडे, प्रमोद क्षीरसागर, राहुल नागटिळक, गौतम पटेकर, राहुल भिमटे, पंकज धेंडे, अमर बल्लाळ, सिद्धार्थ मोरे, प्रतिक गंगावणे आदींनी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना भेटून शासनाच्या प्रस्तावित उपवर्गीकरण प्रक्रियेबाबत निवेदन दिले. यावेळी शासनाने ही प्रक्रिया पूर्णतः स्थगित करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. शिष्टमंडळाशी संवाद साधताना अण्णा बनसोडे यांनी सांगितले की, उपवर्गीकरण प्रक्रियेबाबत अनुसूचित जाती समाजात, विशेषतः आंबेडकरी आणि नवबौद्ध घटकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, शिष्टमंडळातील प्रमुख राहुल डंबाळे यांनी सांगितले की, अनुसूचित जाती समाजामध्ये उपवर्गीकरण प्रक्रियेबाबत मोठ्या प्रमाणात संभ्रम व असंतोष आहे. समाजातील विविध घटकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. जर अपरिहार्य परिस्थितीत उपवर्गीकरण प्रक्रिया राबविण्यात येणार असेल, तर ती लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावी तसेच आगामी जनगणना पूर्ण होईपर्यंत ही प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी, अशीही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

### 8 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोर शिक्षा द्या : अमित गोरखे



पिंपरी (दैनिक संध्या) : विद्यानगर परिसरात एका ८ वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे. या घटनेबाबत आमदार गोरखे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, “निष्पाप चिमुकलीवर झालेला अत्याचार हा अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार आहे. शहरात अशा विकृत प्रवृत्ती डोके वर काढत असतील, तर त्यांना वेळेतच ठेचून काढणे ही सर्वांची जबाबदारी आहे,” असे म्हटले आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपास वेगाने सुरू केला असून आरोपी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला तात्काळ ताब्यात घेऊन बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. आरोपीच्या विकृत कृत्याचा विचार करता, कायद्याच्या चौकटीत राहून त्याला कठोरातील कठोर शिक्षा व्हावी, यासाठी पोलीस प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कटिबद्ध असल्याचेही गोरखे यांनी स्पष्ट केले. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी विद्यानगर परिसरात तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच, “पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळवून द्यावा. जोपर्यंत पीडितेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आमचा पाठपुरावा सुरू राहील,” असे आश्वासन आमदार अमित गोरखे यांनी दिले.

### पिंपरी महापालिका कार्यालयांत दाखल्यांसाठी नागरिकांचे हाल

पिंपरी (दैनिक संध्या) : शहरातील महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नागरिकांना साध्या दाखल्यांसाठीही अक्षरशः हेलपाटे मारावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. डोमिसाईल, उत्पन्न दाखला, प्रतिज्ञापत्र यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी रांगा लागत आहेत. येथे ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बाकडे नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे दिसत आहे. एका बाजूला प्रशासन डिजिटल सुविधांचा दावा करत असताना दुसऱ्या बाजूला सर्व्हर डाऊनचा फटका नागरिकांना बसत आहे. कार्यालयांमध्ये एजंटांचा वाढता हस्तक्षेप, सामान्य नागरिकांच्या तुलनेत त्यांची होणारी जलद कामे, प्रतिज्ञापत्रासाठी अधिकृत शुल्कापेक्षा जास्त रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, वरिष्ठांकडे तक्रार केल्यानंतरही ऑनलाइन कामे करा, इ-सेवा केंद्रात जा, घाई असेल तर येथे येऊ नका, अशी उत्तरे मिळत असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. अप्पर तहसील आणि क्षेत्रीय कार्यालये एकाच इमारतीत असल्याने परिसरात पार्किंगचा मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. अधिकाऱ्यांच्या वाहनांमुळे नागरिकांना वाहने लावण्यासाठी जागा मिळत नाही. भरदिवसा पार्किंगमधील दिवे सुरू असल्याने ऊर्जा बचतीच्या घोषणांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. वारंवार सर्व्हर डाऊन होणे, जनरेटरची सुविधा नसणे आणि दिवसाला केवळ मर्यादित फॉर्म स्वीकारले जाणे यामुळे लांबून आलेल्या नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशासनाने वर्षभरात एक लाखाहून अधिक दाखले वितरित केल्याचा दावा केला आहे. महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. कामासाठी आलेल्या वृद्धांना तासन्तास उभे राहावे लागत असून, बसण्यासाठी बाकडे नाहीत. पिण्याच्या पाण्याचीही योग्य व्यवस्था नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

### मावळात पीएमआरडीए रिंगरोडविरोधात शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) प्रस्तावित अंतर्गत रिंगरोड प्रकल्पाविरोधात मावळ तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. रिंगरोडच्या मूळ आराखड्यात बदल करून काही धनदांडग्या आणि विकसकांना फायदा पोहचविण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. तसेच, प्रकल्पाच्या रचनेत आणि टाऊन प्लॅनिंग (टीपी) स्कीममध्ये पारदर्शकता आणण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली असून, अन्यथा व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. मावळातील सांगवडे, दारुंबे, साळुंबे, नेरे, धामणे आणि गोडुंबरे या गावांतील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली.

## प्रत्येकाला हरवलेला मार्ग दाखवणारी वारी - आयुक्त विजय सूर्यवंशी

पिंपरी (दै. संध्या)

■ ज्ञान, ध्यान आणि समाधान म्हणजे "अंतर्नाद" ची वारी - भावार्थ देखणे

■ "अंतर्नाद" या भव्य संगीत नाटकाच्या शुभारंभ प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



आजच्या युगात प्रत्येक माणूस हरवलेला आहे. "स्व" मधला विठ्ठल शोधण्यासाठी "अंतर्नाद" पहावा. साक्षात विठ्ठल दर्शनाची अनुभूती मिळते. भक्तीरसाने ओथंबलेल्या यातील प्रत्येक कलाकार आपल्याला वारीला न जाताही वारी अनुभवायची संधी देतात. अंतर्नाद या संगीत नाटकातील एकही गीत कॉपी केलेले नाही केवळ या प्रयोगासाठी लिहिले आहेत हे नाविन्यपूर्ण आहे. शुभारंभाचा हा प्रयोग संस्मरणीय झाला आहे असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी केले.

'अंतर्नाद' या संगीत नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग शनिवारी, (दि.१६) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पार पडला. यावेळी आयुक्त बोलत होते.

यावेळी तुडुंब भरलेल्या प्रेक्षागृहात आळंदी ज्ञानेश्वर संस्थान कमिटी अध्यक्ष भावार्थ देखणे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष व मोरया थिएटरचे संस्थापक, "अंतर्नाद" चे निर्माते भाऊसाहेब भोईर आदी उपस्थित होते.

ज्ञानेश्वर संस्थान कमिटी अध्यक्ष भावार्थ देखणे यांनी सांगितले की, अंतर्नाद पाहून नाट्यगृहातील प्रत्येक व्यक्ती भारावलेला आहे. भगवंताच्या प्रति आपण फक्त आणि फक्त नतमस्तक होतो. माझे वडील डॉ. रामचंद्र देखणे नेहमी सांगायचे की, ज्ञान, ध्यान आणि समाधान म्हणजे पंढरपूरची वारी होय. ज्ञानी माणसांना पंढरपूरची उपासना आहे. ध्यानी माणसांना ध्यानाची उपासना आहे. सामान्य माणसांना समाधानाची उपासना आहे. खऱ्या अर्थाने हा प्रयोग पाहिल्यानंतर अडीच तासात नंतर जे समाधान प्राप्त होते ते कशानेही प्राप्त होत नाही. एकदा का माझ्यातल्या मी पणाचा अंत झाला की मी या जगामध्ये किती लहान आहे. खऱ्या अर्थाने या पांडुरंगाला भेटण्यासाठी, परब्रम्हाला आनंद देण्यासाठी प्रत्येक कलाकाराने प्रत्यक्ष भगवंत होऊन आम्हालाही नाचायला लावले हे अंतर्नादचे वैशिष्ट्य आहे. या वारीत मला माझ्या वडिलांचे दर्शन झाले असेही भावार्थ देखणे म्हणाले.

भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, अंतर्नाद ची निर्मिती करून मला माझी आई परत सापडली असे वाटते. ५१ कलाकारांच्या या टीमने पहिलाच प्रयोग अगदी २५ वा असल्यासारखा अभिनय व काम केले आहे.

या भव्य संगीत नाटकाचा दुसरा प्रयोग हडपसर येथील विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २२ मे), सायंकाळी सात वाजता होणार आहे. रसिक प्रेक्षकांसाठी या नाटकाची तिकिटे 'बुक माय शो' आणि 'तिकीट खिडकी' या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. तसेच चिंचवड येथील नाट्यगृहाच्या तिकीट खिडकीवरही विक्री सुरू आहे. अंतर्नाद चे कलाकार प्रणव सपकाळे, मनोज डाळिंबकर, निरंजन पेडगावकर, अंकिता शिवतरे, राजू बंग आदींसह सर्वांनी उत्तम कामगिरी करत पहिलाच प्रयोग यशस्वी केला आहे अशी माहिती दिग्दर्शक मनोज डाळिंबकर यांनी दिली.

पोवाडा, पिंगळा, वासुदेव, लावणी, जात्यावरील गाणी, भूपाळी आणि रॅप साँगचा समावेश करण्यात आलेल्या या नाटकाचे लेखन विनोद रत्ना, संकल्पना व दिग्दर्शन मनोज डाळींबकर, संगीत निरंजन पेडगावकर आणि गीते मुराद तांबोळी यांनी शब्दबद्ध केली आहेत. नृत्यदिग्दर्शन अंकिता शिवतरे व सौगंध कापसे यांनी केले आहे. तांत्रिक बाजू अभिप्राय कामठे (प्रकाश योजना), कमलेश बिचे (रंगभूषा) आणि वेदिका काळे (वेशभूषा) यांनी सांभाळली आहे. सहाय्यक दिग्दर्शन आकाश थिटे यांनी केले आहे.

## मोशी जलतरण तलावात ११ वर्षीय मुलीचा पाय जाळीत अडकला

मोशी (दै. संध्या)


यमुनानगर येथील मीनाताई ठाकरे जलतरण तलावात एक धक्कादायक आणि तितकीच चिंताजनक घटना समोर आली आहे. येथे पोहण्यासाठी आलेल्या अर्णवी दारफळे या 11 वर्षीय मुलीचा पाय घसरून तलावाच्या बाजूला असलेल्या सिमेंटच्या चेंबरच्या जाळीत अडकला. चिमुरडीस असह्य वेदना झाल्या. ती जोरजोरात रडू लागली. या घटनेमुळे येथील नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केला आहे. अखेर उपस्थित नागरिक आणि कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नानंतर तब्बल अर्ध्या तासाने या मुलीचा पाय बाहेर काढण्यात यश आले. मात्र, या दुर्लक्षामुळे सर्व पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, अर्णवी जलतरण तलावाच्या काठावर असताना अचानक तिचा पाय घसरला आणि तो थेट सिमेंटच्या जाळीच्या फटीत गेला. पाय इतका घट्ट अडकला होता की तो सहज काढणे अशक्य झाले होते. शेवटी छनी आणि हातोड्याच्या साहाय्याने ती सिमेंटची जाळी अत्यंत काळजीपूर्वक तोडण्यात आली आणि त्यानंतरच मुलीचा पाय सुखरूप बाहेर काढता आला. या संपूर्ण प्रकारात मुलीच्या पायाला दुखापत झाली असून, तिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.

तलावाच्या सुरक्षेबाबतचा हा पहिलाच प्रकार नसून, आतापर्यंत अशा स्वरूपाच्या चार घटना येथे घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## पुणे जिल्हा ॲथलेटिक्स स्पर्धेत साई स्पोर्ट्स ॲकॅडमीचा दबदबा

*मधुरा खांबे व समृद्धी भोईरची सुवर्ण कामगिरी, महापौरांकडून विजेत्यांचा विशेष सन्मान*

पिंपरी (दै. संध्या)



पुणे विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पुणे जिल्हा सीनियर ॲथलेटिक्स स्पर्धेत पिंपरीच्या साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत आपला ठसा उमटवला. पुणे डिस्ट्रिक्ट ॲमेच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दोन दिवसीय स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील नामवंत खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विजयी ठरलेल्या खेळाडूंची निवड महाराष्ट्र राज्य स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे.

या स्पर्धेत साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या मधुरा खांबे आणि समृद्धी भोईर यांनी दिवस गाजवला. मधुरा खांबे हिने लॉंग जंप आणि ट्रिपल जंप या दोन्ही प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत दोन सुवर्णपदके पटकावली. तर समृद्धी भोईर हिने हेप्टॅथलॉन प्रकारात सुवर्णपदक मिळवत अकॅडमीच्या यशात भर घातली. याशिवाय अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या इतर जिल्ह्यातील खेळाडूंनीही आपल्या जिल्ह्यांतून राज्य स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. प्राची अंधारे हिची वॉकिंग स्पर्धेसाठी धाराशिव जिल्ह्यातून निवड झाली आहे. जळगाव जिल्ह्यातून आदित्य महाजन याची ट्रिपल जंप प्रकारात निवड झाली असून भावेश चौधरी आणि मयूर चौधरी या दोघांची वॉकिंग स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या एकूण सहा खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा ३० मेपासून पुणे विद्यापीठाच्या मैदानावर होणार आहे.

या सर्व खेळाडूंचा पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी विशेष सन्मान केला. यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, नगरसेवक सुरेश भोईर, प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे उपस्थित होते. हे सर्व खेळाडू गेल्या अनेक वर्षांपासून साई स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये नियमित सराव करत असून प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे आणि ज्युनिअर प्रशिक्षक ज्ञानेश्वरी कुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना राज्यस्तरावर यश मिळत आहेत.

## तरूण- तरूणीचा लोणावळा जवळील शिरोता धरणामध्ये बुडून मृत्यू

लोणावळा (दै. संध्या)



लोणावळा शहराजवळ असलेल्या शिरोता डॅम परिसरात एक दुर्दैवी घटना घडली आहे. रविवारी (दि.१७ मे) रोजी सुट्टी असल्याने पर्यटनासाठी आलेल्या मित्रांच्या ग्रुपमधील तरुण व तरुणीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. करण ज्ञानदेव ठोंबरे (वय २०, रा. बालाजीविहार, कोडोली, सातारा) आणि कु. आर्या सुशांत बंडावार (वय २०, मूळ रा. गोंदिया) अशी मृत पावलेल्या दोघांची नावे असून दोघे विद्यार्थी असून पुणे परिसरात शिक्षण घेत होते. याप्रकरणी सुसगाव (ता. मुळशी, जि. पुणे, मूळ रा. कोलबले, जवळ हॉटेल पाटीलवाडा, धुळे) येथे राहणारा आणि ISBM कॉलेजमध्ये द्वितीय वर्षात शिकणारा मृत विद्यार्थ्यांचा मित्र कु. सुजल प्रकाश पवार (वय १९, व्यवसाय: शिक्षण) याने कामशेत पोलीस ठाण्यात अधिकृत खबर दिली आहे.

पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१७) सकाळी ७:०० वा. सुमारास सुजल हा त्याचा मित्र करण ठोंबरे, आर्या बंडावार, आस्था टेंबरे, सृष्टी गवाडे आणि ज्योत्स्ना शेळके अशा ६ जणांच्या ग्रुपसह राजमाची किल्ला येथे फिरण्यासाठी दोन दुचाकी आणि दोन स्कूटीवरून निघाले होते. राजमाची जवळ पोहोचल्यानंतर सर्वांच्या संमतीने गडावर न जाता ‘शिरोता डॅम’ येथे फिरण्याचा बेत ठरला. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हे सर्वजण डॅमच्या बॅकवॉटर परिसरात पोहोचले आणि पाण्यात पाय सोडून गप्पा मारत बसले. दरम्यान पाण्याचे गाळ आणि गढूळ स्वरूप पाहून आर्या आणि ज्योत्सना या दोघी “येथे गढूळ पाणी आहे, आपण पुढे जाऊ” असे म्हणत पुढे गेल्या. काही वेळातच दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास ज्योत्सनाचा “वाचवा... वाचवा...” असा ओरडण्याचा आवाज आला.

## भाजी मंडईत वाटाणा-बिन्स महाग; लिची-फणसाची बाजारात जोरदार मागणी

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 17) बाजारात गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते. फक्त बिन्स आणि वाटाण्याच्या दरात वाढ झाली आहे. वाटाणा आणि बिन्स आवक कमी असल्याने दरवाढ झाली आहे. पालेभाज्यांच्या दरात किंचित घट झाली होती. कोथिंबीर व मेथीची जुडी 30 रुपये दराने होती. गवार आणि शेवगा आता 50-60 रुपये किलो दराने उपलब्ध होते. वांगी, फ्लॉवर 40-50 रुपये किलो दराने होते. मिरची 50 रुपये, कर्नाटक कैरी बाजारात 50-60 रुपये किलो होती. कांदे 100 रुपये 5 किलो होते. लसूण 100- 150 रुपये तर आले 80-90 रुपये किलो दराने उपलब्ध होते. रविवारी बाजारात गवार 70, शेवगा 60, टोमॅटो 25, भेंडी 60, फ्लॉवर 30, कोबी 25, मिरची 50, गाजर 25, शिमला 60, लसूण 100-120, आले 70, वांगी 40, काकडी 40, कारले 70, कांदे 20-25, बटाटा 25-30, बिन्स 160, पावटा 80, लाल भोपळा 30, घोसाळी 60, दोडका 70. तोंडली 70, बीट 50, दुधी 40, घेवडा 60.

## “विलास लांडेंना पाडण्यासाठी मी १५ वर्षे तुमचं काम करते”

**माजी महापौर मंगला कदम यांनी आमदार महेश लांडगे यांना सुनावले..!**

पिंपरी (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या तथा माजी महापौर मंगला कदम यांनी आमदार महेश लांडगे यांना थेट जाब विचारल्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या व्हिडिओमुळे भोसरीच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये मंगला कदम या आमदार महेश लांडगे यांच्यावर नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. “माजी आमदार विलास लांडे यांना पाडण्यासाठी मी १५ वर्षे तुमचे काम केले. मात्र, आता तुमचे नगरसेवक आमची मदत करत नाहीत,” असा थेट आरोप त्यांनी केला असल्याचे व्हिडिओत दिसून येत आहे. यावेळी मंगला कदम यांनी आमदार लांडगे यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत नाराजी व्यक्त केली. या चर्चेदरम्यान उपस्थित काही कार्यकर्त्यांनी मोबाईलमध्ये व्हिडिओ चित्रीकरण सुरू केले होते. मात्र, व्हिडिओ शूटिंग सुरू असल्याचे लक्षात येताच आमदार महेश लांडगे यांनी मोबाईल बंद करण्यास सांगितल्याचेही व्हिडिओमध्ये दिसत असल्याचा दावा केला जात आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, महापालिका प्रभाग ११ चिखली घरकुल परिसरात महापालिकेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पाच्या परिसरात पाणथळ जागा, धावण्यासाठीचा मार्ग (जॉगिंग ट्रॅक) आणि जुनी-नवी मिळून घनदाट वृक्षवल्ली आहे. या ठिकाणी विविध पक्षी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचा मोठा वावर असतो. स्पाइन रस्ता आणि प्रभाग १० मधील संभाजीनगरच्या मध्यभागी हा परिसर येतो. या जागेवर गेल्या पाच महिन्यांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माजी महापौर मंगला कदम यांच्या पुढाकाराने जवळपास २५ गुंठे क्षेत्रावर धार्मिक स्थळ उभारण्याचे काम सुरू आहे. मंगला कदम यांचे सुपुत्र कुशाग्र कदम हे भाजपचे नगरसेवक आहेत. मंगला कदम यांच्या पुढाकाराने सुरू असलेल्या या कामाला आमदार महेश लांडगे यांच्या समर्थक असलेल्या प्रभाग ११ मधील नगरसेविका योगिता नागरगोजे यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. या परिसरातील धावण्याच्या मार्गावर सकाळी आणि सायंकाळी नागरिक व्यायामासाठी मोठ्या संख्येने येतात. तसेच, पोलीस दलात भरती होण्यासाठी पूर्वतयारी करणारे जवळपास ३०० तरुण दररोज येथे धावण्याचा सराव करतात. त्यामुळे या ठिकाणी कोणतेही बेकायदेशीर काम होऊ दिले जाणार नाही, असे नगरसेविका नागरगोजे यांचे म्हणणे आहे. दोन दिवसांपासून मंगला कदम आणि योगिता नागरगोजे यांच्यातील हा वाद अत्यंत विकोपाला गेला आहे. शनिवारी नागरगोजे यांनी सुरू असलेल्या कामाला प्रत्यक्ष विरोध केला. त्यानंतर कदम यांनी आपल्या समर्थकांसह रस्त्यावर उतरून थेट आमदार महेश लांडगे यांना गाठले आणि जाब विचारला.

आमदार लांडगे एका कामगार मेळाव्यासाठी या भागातील एका सभागृहात आले होते. कार्यक्रम संपवून ते परतत असताना कदम यांनी त्यांना रस्त्यात रोखले आणि तीव्र शब्दांत सुनावले. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात असून, राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणावर आमदार महेश लांडगे किंवा त्यांच्या समर्थकांकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धनंजय मदने यांचा विशेष सन्मान

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय, प्रेरणादायी आणि सातत्यपूर्ण योगदानाबद्दल ॲथलेटिक्स क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्व धनंजय मदने यांना 'जपान कराटे-डो ननबुकई शितो रिओ इंडिया' तर्फे विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुण्यात उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडलेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून देश, राज्य आणि समाजाचे नाव उंचावणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास कबड्डी क्षेत्रातील अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम बापू जाधव, ज्येष्ठ कवी म. भा. चव्हाण, 'जपान कराटे-डो ननबुकई शितो रिओ इंडिया'चे अध्यक्ष राजू थापा तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेस पुणे शहराध्यक्ष किशोर कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग पंच डॉ. मदन कोठुळे आणि मनोहर ताठवडकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना धनंजय मदने म्हणाले, 'हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे. 'जपान कराटे-डो ननबुकई' संस्थेचे तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या गौरवामुळे भविष्यात क्रीडा क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे' युवा पिढीला प्रेरणा देणारा आणि क्रीडा संस्कृतीला नवी दिशा देणारा हा सोहळा ठरला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन सोनु भैया ठक्कर आणि युवराज दिसले यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने खेळाडू, प्रशिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

### वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनी स्वयंशिस्त पाळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी शहरातील विविध मुख्य व मंदिर परिसर तसेच प्रमुख रस्त्यांवर वाढणारी वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणाच्या समस्यांबाबत धर्मशाळा, मंगल कार्यालय चालक-मालक, सर्वपक्षीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपस्थित कार्यालय चालक-मालक, सर्वपक्षीय नेते आणि लोकप्रतिनिधींनी शहरातील वाहतूक समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी विविध सूचना मांडल्या. त्यामध्ये आळंदी बायपास मार्ग तातडीने सुरू करणे, वाहनतळांची संख्या वाढवणे, रस्त्यावरील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करणे, शहरात दिशादर्शक व रस्ता मार्गदर्शक फलक उभारणे, तसेच पार्किंग व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करणे आदी मागण्यांचा समावेश होता. नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी सांगितले की, आळंदी ही धार्मिक व भाविकांची नगरी असल्याने शहरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे प्रशासनाने उपाययोजना राबविण्यासोबतच नागरिकांनीही वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. सर्वांच्या सहकार्यानेच शहरातील वाहतूक कोंडीवर प्रभावी तोडगा निघू शकतो, असे त्यांनी नमूद केले. यावेळी उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, वरिष्ठ पोलीस अधिकारी बी.एस.नरके, वाहतूक शाखेचे सतीष नांदूकर सर, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आजी-माजी नगरसेवक, सर्वपक्षीय पदाधिकारी, लग्न कार्यालय चालक-मालक तसेच आळंदीकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नारायणगावातील गुंड तडीपार

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव पोलिसांनी सराईत आरोपी मोन्टु छोटेलाल सिंग याला गुन्हेगारी कृत्यांमुळे एक वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे. सदर आरोपीविरुद्ध नारायणगाव पोलीस ठाण्यात बेकायदेशीर जमाव जमवून मारामारी करणे, दुखापत, जबरी चोरी, दहशत निर्माण करणे, सार्वजनिक शांतता भंग करणे आदी गंभीर स्वरूपाचे चार गुन्हे दाखल आहेत. आरोपीकडून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करून नागरिकांना धमकावले जात असल्यामुळे पोलिसांकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपीमध्ये सुधारणा व्हावी यासाठी यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्याच्या वर्तणुकीत कोणताही बदल न झाल्याने पोलिसांनी त्याच्या हालचाली व गुन्हेगारी प्रवृत्तीचा अहवाल तयार करून उपविभागीय दंडाधिकारी, मंचर यांच्याकडे तडीपार प्रस्ताव सादर केला होता.त्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी यांनी आरोपीस पुणे जिल्ह्यातून एक वर्ष कालावधीसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले .त्यानुसार आरोपीस अहमदनगर जिल्ह्यात सोडण्यात आले असून पुणे जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश न करण्याची ताकीद देण्यात आली होती. आदेशाचे उल्लंघन केल्यास त्याच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीप गिल्ल, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमोद शिरसागर ,जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील ,अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सपांगे ,पोलीस कॉन्स्टेबल सुभाष थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे महादेव शेलार यांनी केली.

### शॉर्टसर्किटमुळे गोठ्यासह वैरणीला भीषण आग; कोरेगाव खुर्द येथील घटना



चाकण (दैनिक संध्या) : शॉर्टसर्किटमुळे जनावरांच्या गोठ्यासह वैरणीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना खेड तालुक्यातील कोरेगाव खुर्द येथे घडली. या आगीत जनावरांचा चारा जळून खाक झाला असून, गोठ्याचे मोठे नुकसान झाले आहे. धक्कादायक म्हणजे या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी चार दुभत्या गाया गंभीर जखमी झाल्या आहेत. अंकुश नामदेव घनवट यांच्या घराजवळ रविवारी सायंकाळच्या दरम्यान वीज वाहक तारांच्या घर्षनाने शॉर्टसर्किट झाल्याने हा प्रकार घडला. आगीच्या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनिता बुट्टे पाटील, आंबेठाण गावचे माजी सरपंच दत्तात्रय मांडेकर, कोरेगाव खुर्दचे सरपंच राजू झांबरे, उद्योजक दत्तात्रय घनवट आदींनी घटना स्थळाची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने भरपाई मिळण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे. वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळेच ही घटना घडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या भागात अनेक वेळा अशा धक्कादायक घटना घडूनही प्रशासन त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

# महागाईतच दुष्काळात तेरावा महिना

**काऱ्हाटी (दै. संध्या)**

तीन वर्षांनी येणारा अधिक मास, म्हणजेच धोंड्याचा महिना यंदा १७ मेपासून सुरू होत असून तो १५ जूनपर्यंत राहणार आहे. या महिन्यात जावयाला सोने किंवा चांदीचा धोंडा, दागिना अथवा भेटवस्तू देण्याची परंपरा ग्रामीण भागात आजही मोठ्या उत्साहात पाळली जाते. मात्र यंदा सोन्या-चांदीच्या दरांनी उच्चांक गाठल्याने जावईबापूंना नेमका कोणता धोंडा द्यायचा याचा विचार सासरकडील मंडळींना पडला आहे.

जावयासाठी सोन्या-चांदीचे धोंडे, अंगठ्या, चेन, नाणी तसेच चांदीच्या विविध वस्तूंना मागणी वाढेल, या अपेक्षेने व्यापाऱ्यांनी



विविध वजनांतील दागिने आणि आकर्षक भेटवस्तूंचा साठा तयार ठेवला आहे; मात्र सोन्या-चांदीचे दर उच्चांकावर पोहोचल्याने ग्राहकांचा कल हलक्या वजनाच्या दागिन्यांकडे आणि

**१७ मेपासून धोंड्याच्या महिन्याला सुरुवात झाली**

प्रतीकात्मक भेटवस्तूंकडे वाढताना दिसत आहे. वाढलेल्या दरांमुळे खरेदी सासरकडील मंडळींच्या खिशाला महागाईची झळ अधिक सोसावी लागणार असल्याचे चित्र आहे.

हिंदू पंचांगानुसार चंद्र आणि सौर कालगणनेतील तफावत भरून काढण्यासाठी दर तीन वर्षांनी अधिक मास येतो. या महिन्याला धार्मिकदृष्ट्या अत्यंत पवित्र मानले जाते. अधिक मासात भगवान विष्णूची उपासना, आणि विधींना विशेष महत्त्व

अधिक मासात धोंड्याच्या मानासाठी जावईबापूंना सासरी खास निमंत्रण दिले जाते. यावेळी जावयाचा सत्कार करून त्याला सोने, चांदी, कपडे किंवा प्रतीकात्मक भेटवस्तू देण्याची परंपरा अनेक कुटुंबांत आजही जपली जाते.

यंदा सोन्याचे दर गगनाला भिडल्याने अनेकांसाठी सोन्याचा धोंडा देणे अवघड झाले आहे. त्यातच चांदीचे भावही वाढल्याने पारंपरिक धोंड्याच्या मानासाठी यंदा सासरकडील मंडळींचे बजेट कोलमडण्याची चिन्हे आहेत.

यंदा १७ मेपासून अधिक मास, अर्थात धोंड्याच्या महिन्याला सुरुवात होत असून तो १५ जूनपर्यंत रा-हणार आहे. दर तीन वर्षांनी येणाऱ्या या महिन्यात जावयाला सोने, चांदी अथवा विविध भेटवस्तू देण्याची परंपरा असल्याने बाजारपेठेत हालचाल सुरू झाली आहे.

> गॅस सिलिंडर, खाद्यतेल आणि किराणा सामानाच्या वाढत्या दरांनी यंदा अधिक मासातील अनारसे बनविण्याची परंपराही महागली आहे. तांदूळ, साखर, तूप, तेल यांसह गॅसच्या वाढलेल्या खर्चामुळे गृहिणींचे बजेट कोलमडले. धोंड्याचा महिना सुरू असल्याने आर्थिक संकट निर्माण झाले आहे.
> **शेतकरी - पायल ढमे**

## मतदार जनजागृती शिबिराचा सहाशे जणांना लाभ



**चाकण (दै. संध्या)**

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान, शिवसेना खेड तालुका व नगरसेवक तथा आझाद हिंद मंडळाचे अध्यक्ष शशिकांत जाधव मित्र परिवार व चाकण नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या मतदार जनजागृती शिबिराचा सहाशे जणांनी लाभ घेतला. एसआयआर तथा विशेष गहन पुनरावृत्ती अंतर्गत येथील प्रभाग क्रमांक ११ मध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, नगरसेवक मंगेश कांडगे, महेश शेवकरी, शशिकांत जाधव, उद्योजक योगेश देशमुख, अभिजीत जाधव, अशोक जाधव, मयूर भुरूक, राजेंद्र सुतार, राहुल फुलवरे, अनिल फुलवरे, गणेश जाधव, केदार देशमुख, हर्षल जाधव, सुधीर करपे, चंद्रकांत अहिलकर, सोपान टोपे, गणेश होले, राजेंद्र वाघमारे व खुनमीर बालगुडे आदी उपस्थित होते. नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी यावेळी नगरसेवक शशिकांत जाधव, स्मिता जाधव, मयूर भुरूक व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले. अभिजीत जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

## जुन्नर मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. प्रशांत काचळे

### सचिवपदी डॉ. प्रविण शिंदे तर खजिनदारपदी डॉ. संतोष भोर यांसह पदाधिकारी नियुक्त

**नारायणगाव (दै. संध्या)**



जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन या डॉक्टरांच्या संघटनेचा वार्षिक पदग्रहण सोहळा नीलम गार्डन नारायणगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात मावळते अध्यक्ष डॉ. प्रसाद शिंगोटे यांनी नवनियुक्त अध्यक्ष डॉ. प्रशांत काचळे यांच्याकडे अध्यक्षपदाचा कार्यभार सुपूर्द केला. यावेळी एक डॉक्टर एक झाड तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवणार असल्याचे अध्यक्ष डॉ.प्रशांत काचळे यांनी सांगितले

यावेळी सन २०२६-२७ साठी पुढील प्रमाणे कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यात अध्यक्षपदी डॉ. प्रशांत काचळे, उपाध्यक्षपदी डॉ. आनंद सराईकर व डॉ. हेमा अडसरे, सचिवपदी डॉ. प्रवीण शिंदे व डॉ. सारिका फुलवडे, तर खजिनदारपदी डॉ. संतोष भोर व डॉ. मयुरी पाटील, यांची सर्वानुमते नियुक्ती केली आहे. तसेच यावेळी विविध समित्या नियुक्त करण्यात आल्या.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, माजी जि. प. उपाध्यक्ष शरद लेंडे, सरपंच डॉ. शुभदा वाव्हळ, उपसरपंच योगेश पाटे, बाजार समिती संचालक माऊली खंडागळे, मनसेचे मकरंद पाटे, प्रकाश पाटे, जेटीएमपीए ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.प्रदीप जोशी, उपाध्यक्ष डॉ. राहुल तांबे, सचिव डॉ. संदीप काकडे, डॉ. सदानंद राऊत, डॉ. हनुमंत भोसले, डॉ. संदीप डोळे, डॉ. समीर डेरे, डॉ. प्रतीक गायकवाड उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत कार्यकारिणीला शुभेच्छा देत असोसिएशन राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी संघटनेचा गेल्या चाळीस वर्षांचा गौरवशाली इतिहास चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला. या समारंभाचे प्रास्ताविक डॉ. प्रताप रोहोकले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. स्मिता डोळे, डॉ. विनायक अडसरे, डॉ. मयुर पांचाळ यांनी सूत्रसंचालन केले, तरडॉ. सारिका फुलवडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पदग्रहण समारंभ यशस्वी होण्यासाठी डॉ.सचिन हांडे, डॉ. धिरज तोडकर, डॉ. पल्लवी पांचाळ, डॉ. केतकी काचळे व नारायणगाव डॉक्टर असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## नारायणगाव ग्रामपंचायतीला ग्राम समृद्धीचा ध्यास

**नारायणगाव (दै. संध्या)**



ग्राम समृद्धी म्हणजे केवळ आर्थिक विकास नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय विकासाचा समतोल साधणे होय. त्या दृष्टीने उपसरपंच योगेश पाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य, राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून काम सुरू आहे. ग्राम समृद्धी साध्य करण्यासाठी विकास कामाबरोबरच तरुणांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वृक्षारोपण, महिलांना व्यवसाय मार्गदर्शन, आरोग्य तपासणी शिबिर याकडे लक्ष दिले जात आहे. त्याचे दृश्य स्वरूपातील परिणाम दिसू लागले आहे. यामुळे नारायणगाव ग्रामपंचायतीची ओळख खऱ्या अर्थाने समृद्धग्राम होत आहे.

ग्लोबल वॉर्मिंगचा विचार करून नारायणगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गणपीर बाबा डोंगर परिसरात वनविभागाच्या जागेत सुमारे ५ हजार देशी झाडांचे वृक्षारोपण करून संवर्धन केले आहे. या झाडांना नियमित पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे वनराई फुलली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना फळरोपांचे वाटप केले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडून निसर्ग संवर्धन झाले आहे. विषमुक्त भाजीपाला उत्पादनासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने परसबाग भाजीपाला लागवड हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान, रॉयल ॲकॅडमीच्या माध्यमातून तरुणांना एमपीएससी, सरळ सेवा भरतीसाठी वर्ष २०१९पासून मार्गदर्शन केले जात आहे. प्रा. धनेश वारुळे, प्रा. प्रथमेश वाणी हे स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेत आहेत. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक ती पुस्तके उपलब्ध करून दिली जात आहेत. योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळे मागील सहा वर्षात सुमारे शंभर विद्यार्थी प्रशासकीय सेवेत दाखल झाले आहेत.

मुख्यमंत्री व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. मार्केटिंग, सरकारच्या विविध योजना, व्यवसायासाठी कर्ज पुरवठा व अनुदान याबाबतची माहिती देऊन स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. याचा लाभ घेऊन महिलांनी व्यवसाय सुरू केले आहेत. यासाठी ग्रामपंचायत सदस्य भावना बेल्हेकर, धनेश वारुळे हे मार्गदर्शन करत आहेत.

ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, पुण्यातील डी. वाय. पाटील आरोग्य महाविद्यालय व इतर सामाजिक संस्थांच्या वतीने नारायणगाव ग्रामपंचायतीकडून आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन केले जाते. या माध्यमातून गरजू रुग्णांवर उपचार केले जातात. शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू व इतर अशा सुमारे एक शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. या शिबिराचा लाभ गरजू रुग्णांना झाला आहे. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी नारायणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले आहे. या वाचनालयाची स्थापना १९५९मध्ये करण्यात आली आहे.

## प्रकल्पाला १७२.२२ कोटींची मंजुरी

मंचर (दै. संध्या) : पवित्र ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकरच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत 172 कोटी 22 लाख रुपये खर्चाच्या'श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखड्या'ला मंजुरी देण्यात आली. या कामाला गती मिळणार आहे ."अशी माहिती राज्याचे माजी सहकार मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दिली. वाढत्या भाविकसंख्येच्या पार्श्वभूमीवर परिसरातील वाहतूक कोंडी, पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक सुविधांचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. भीमाशंकर येथे वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. त्यातून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी या विकास आराखड्यात अनेक महत्त्वपूर्ण सुविधा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.




## शनि जयंती उत्साहात साजरी

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

राजगुरुनगर येथे श्री शनी महाराज प्रतिमेच्या भव्य मिरवणुकीने शनि जयंती भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शनि जयंतीनिमित्त येथील मुख्य रस्त्यावरील वाडा रोड, सरदार चौकातील शनिमंदिरात सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता. शनी जयंती उत्सव समितीच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी लघुरुद्र अभिषेक व शनी जन्म सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. तसेच महाप्रसाद, कीर्तन आणि प्रवचन कार्यक्रमांनाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सायंकाळी श्री शनी महाराज प्रतिमेची भव्य मिरवणूक शहरातून काढण्यात आली. मिरवणुकीत अध्यक्ष बाळासाहेब कहाणे, अनिल कहाणे, अविनाश कहाणे, सुनील मावळे, चेतन कहाणे, पप्पू कहाणे, नितेश ओसवाल, नितीन शहा, गणेश कहाणे, संदीप लोखंडे, किरण कहाणे, उमेश कहाणे, संजय येवले, ताराचंद दहीतुले, उल्हास कहाणे आदी मान्यवरांसह महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## तांबडेमळा येथे रस्ता अडविल्याने रविवार पासून ३०० हून अधिक कुटुंबांचे दळवळण थांबले

**मंचर (दै. संध्या)**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या पश्चिमेला तांबडेमळा (ता. आंबेगाव) ग्रामपंचायत हद्दीतून चिमणवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर दगड, गोटे व काटेरी फांद्या टाकून रविवारी (ता.१७)रस्ता अडविल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे परिसरातील सुमारे ३०० हून अधिक कुटुंबांचा २६ तासाहून अधिक काळ दळणवळणाचा मार्ग बंद पडल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने तातडीने रस्ता सुरू करून



द्यावा, अशी मागणी तांबडे मळा ग्रामपंचायतीच्या सरपंच प्राजक्ता तांबडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. आंबेगाव तहसीलदार कार्यालय व मंचर पोलिस ठाणे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे कि माजी उपसरपंच मयूर भोर यांनी संबंधित रस्त्यावर अडथळे निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या रस्त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसह दुचाकी, चारचाकी वाहनांचीही मोठी गैरसोय होत आहे. राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी या रस्त्याच्या विकासासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निधीतून पुणे जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याचे खडीकरण करण्यात आले. असून डांबरीकरणाचे कामही प्रस्तावित आहे. मात्र रस्ता बंद झाल्याने विकासकामांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत माजी उपसरपंच मयूर भोर यांनी सांगितले की, या रस्त्याच्या पुढील भागात चिमणघाट येथे रस्त्यासाठी पूर्वी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र तेथील काही शेतकऱ्यांनी जागा उपलब्ध करून न दिल्याने तो निधी परत गेला. त्यानंतर पुन्हा दिलीप वळसे पाटील यांनी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र संबंधित शेतकऱ्यांचे सहकार्य नसल्याने काम रखडले आहे. "चिमणघाट रस्त्याबाबत स्थानिक शेतकरी सहकार्य करतील, त्यानंतर मी अडविलेला रस्ता खुला करण्यास तयार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सरपंच प्राजक्ता तांबडे यांनी हा आरोप फेटाळून लावला. "चिमणवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी सहमती दर्शविली असून त्यामध्ये मयूर भोर यांचाही समावेश आहे. मात्र चिमणघाट रस्त्याच्या वादातून दुसरा रस्ता बंद करणे योग्य नाही," असे त्या म्हणाल्या.

प्राजक्ता तांबडे यांनी पुढे सांगितले की, चिमणघाट येथे शेतकरी भिवसेन तांबडे यांच्या शेतजमिनीतून सुमारे २६७ मीटर लांबीचा रस्ता प्रस्तावित असून त्यासाठी जवळपास चार गुंठे जमीन जाणार आहे. संबंधित शेतकऱ्याने इतरांनी सहकार्य केल्यास आपणही सहमती देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे चिमणघाट रस्त्याचाही प्रश्न लवकरच बैठक घेऊन मार्गी लावणार आहोत.

# जेजुरी गडावर भेसळयुक्त भंडाऱ्याचा सुळसुळाट

## प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**शुद्ध धार्मिक परंपरेला भेसळीचे ग्रहण; कारवाईअभावी संताप, सामाजिक कार्यकर्त्यांचा इशारा**




उरण (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत तसेच भारतीय लोकदैवत म्हणून प्रसिद्ध असलेल्या तीर्थक्षेत्र जेजुरीची ओळख पिवळ्या शुभ्र भंडाऱ्यामुळे जगभर पोहोचली आहे. मात्र या पवित्र, शुद्ध धार्मिक आणि औषधी महत्त्व असलेल्या भंडाऱ्याला आता भेसळीचे ग्रहण लागल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. जेजुरी गडावर भेसळयुक्त भंडाऱ्याची विक्री आणि वापर वाढत असून प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे भाविकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक ग्रामस्थ, विविध प्रतिष्ठान मंडळे, खांदेकरी, मानकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी गेली अनेक वर्षे भेसळयुक्त भंडाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक प्रशासन, राजकीय नेते आणि श्री मार्तंड देवस्थानाकडे सातत्याने केली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.


उन्हाळी सुट्ट्यांमुळे आणि कुलधर्म-कुलाचारासाठी राज्यासह परराज्यातून आलेल्या भाविकांच्या प्रचंड गर्दीदरम्यान मंदिर परिसरात 'मोर छाप भंडारा' नावाच्या पिशव्या आढळून आल्या. या पिशव्यांमध्ये काळसर रंगाची रांगोळी मिसळल्याचे निदर्शनास आले असून हा भेसळयुक्त भंडारा मोठ्या प्रमाणावर उधळण्यात आल्याचे समोर आले आहे. संबंधित कंपनी सांगली येथील असल्याचे पिशवीवरील माहितीवरून स्पष्ट झाले आहे.

विशेष म्हणजे, या प्रकाराबाबत देवस्थान प्रशासनाने अद्याप कोणतीही नोटीस, सूचना किंवा तक्रार दाखल केलेली नाही. त्यामुळे भाविकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कपाळाला लावला जाणारा आणि मोठ्या प्रमाणावर उधळला जाणारा हा भंडारा डोळ्यात किंवा तोंडात गेल्यास गंभीर आरोग्यधोका निर्माण होऊ शकतो.

यापूर्वीही भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे जेजुरीतील नंदी चौक व महाद्वार परिसरात भंडाऱ्याचा स्फोट होऊन अनेक नागरिक जखमी झाले होते. तरीदेखील या प्रकाराकडे प्रशासन आणि देवस्थान ट्रस्ट गांभीर्याने पाहत नसल्याची खंत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

जेजुरी मार्तंड देवस्थानचे माजी विश्वस्त प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्ते शिवराज झगडे यांनी या भेसळयुक्त भंडाऱ्याच्या काळ्या बाजाराविरोधात उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र प्रशासनाच्या नाकाखालीच हा अवैध प्रकार सुरू असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे. भंडाऱ्याच्या प्रश्नावर विधानसभेत आवाज उठूनही कोणतीही ठोस उपाययोजना झाली नाही. उलट काही मंत्र्यांनी इतर गौण विषयांकडे लक्ष केंद्रित केले, मात्र शुद्ध हळदीचे उत्पादन वाढवून भेसळ रोखण्यासाठी आवश्यक पावले उचलली गेली नाहीत. खंडोबाच्या मंदिरावर भंडाऱ्याची उधळण ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. आयुर्वेदिकदृष्ट्याही हळदीला विशेष महत्त्व आहे. मात्र वाढत्या भेसळीमुळे या पवित्र परंपरेलाच धोका निर्माण झाला असून वेळेत कठोर कारवाई न झाल्यास मोठा अनर्थ घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'नेक्सस वेस्टएंड' मॉलतर्फे 'शिपरेक वंडर्स'चे अनावरण

पुणे (दैनिक संध्या) : या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये 'नेक्सस वेस्टएंड मॉल' मध्ये नऊ मेपासून सुरू झालेल्या 'शिपरेक वंडर्स' (Shipwreck Wonders) या अथांग आणि भव्य अनुभवाच्या माध्यमातून सर्व पुणेकरांना गुप्त खजिने, चाच्यांच्या दंतकथा आणि सागरी सफरीच्या दुनियेत सफर करण्याची संधी मिळणार आहे. किनाऱ्याला लागलेल्या एका गूढ चाच्यांच्या जहाजाचे अवशेष (शिपरेक), जुने झालेले जहाजाचे डेक, चमकणारे खजिन्यांचे बॉक्स, लाकडी डॉक्स, अँकर्स (नांगर), बॅरल्स आणि नाट्यमय सागरी देखावे हे सर्व काही मनमोहक प्रकाशयोजना आणि बारकाव्यांसह जिवंत करण्यात आले आहे. यामुळे येथील प्रत्येक कोपरा एखाद्या चाच्यांच्या गोष्टीसारखा भासतो! हा संपूर्ण 'वॉक-थ्रू' अनुभव असून, यामध्ये सर्व वयोगटांसाठी चाच्यांच्या थीमवर आधारित विविध आकर्षक झोन्स तयार करण्यात आले आहेत. यामध्ये येणारे पर्यटक 'पोज लाइक अ पायरेट' (चाच्यांसारखी पोज द्या), कॅनोनिअर्स ब्लास्ट, कॅप्टन्स हूक रिंग्ज, थरारक पायरेट राइड सिम्युलेशन, बॉल पूल स्लाइड आणि इमर्सिव्ह प्रोजेक्शन रूम : ओशन एक्सपीरियन्स यांसारख्या अनेक मजेदार गोष्टींचा आनंद घेऊ शकतात.



### बॉस बर्गर बाय सोशल तर्फे विशेष ऑफर

पुणे (दैनिक संध्या) : बॉस बर्गर बाय सोशल तर्फे आंतरराष्ट्रीय बर्गर दिनानिमित्त 28 मे रोजी विशेष ऑफर सादर करण्यात आली आहे.ही एक दिवसीय ऑफर पुणे,दिल्ली एनसीआर,बंगळुरू,चंदीगड, मुंबई,कोलकाता,लखनौ,देहरादून आणि हैदराबाद या नऊ शहरांमध्ये असेल. याअंतर्गत 28 मे रोजी स्विगी आणि झोमॅटोवर निवडक बर्गर्सवर 50 टक्के सवलत बॉस बर्गर तर्फे दिली जाणार आहे.




### बॅटरी आणि इलेक्ट्रिफिकेशनला गती देण्यासाठी भारतभर नेटवर्कचा विस्तार

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : ह्युंदाई मोटर ग्रुप तर्फे आपल्या सेंटर ऑफ एक्सलन्स (ह्युंदाई सीओई) चा भारतात विस्तार करण्यात येत असून बॅटरी आणि इलेक्ट्रिफिकेशनच्या तंत्रज्ञानाच्या संशोधन व विकासाला गती देण्यासाठी शैक्षणिक-औद्योगिक भागीदारांचे भारतभर नेटवर्क उभारण्यात येत आहे.या नेटवर्कला बळकटी देत ह्युंदाई मोटर ग्रुपने आयआयटी कानपूर,आयआयटी हैदराबाद, विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी (व्हीएनआयटी) नागपूर आणि तेजपूर युनिव्हर्सिटी या चार भागीदार संस्थांसोबत करारांना औपचारिक स्वरूप दिले आहे.या नवीन समावेशांमुळे हे सहयोगी व्यासपीठ सात विद्यापीठांच्या संघात रूपांतरित झाले आहे.2025 मध्ये आयआयटी मद्रास,आयआयटी दिल्ली आणि आयआयटी बॉम्बे या संस्थापक भागीदारांसह हे व्यासपीठ सुरू झाले आहे.यामुळे स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची आणि भारतासाठी विशेष मोबिलिटी सोल्युशन्स विकसित करण्याची समुहाची वचनबध्दता अधिक दृढ झाली आहे.

### राजेंद्र जगन्नाथ भगत चिरनेर यांची ओबीसी सेल ब्लॉक अध्यक्षपदी निवड



उरण (दैनिक संध्या) : काँग्रेस पक्षासाठी निष्ठेने, निस्वार्थीपणाने आणि प्रामाणिक पणाने काम करणारे, समाजाशी असणारी नाळ, सामाजिक बांधिलकी, पक्षासाठी तन मन आणि धन अर्पण करण्याची दानत असणारे, यांचे वक्तृत्व सुद्धा चोखंदळ आहे आणि खास करून रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे विश्वासू आणि एकनिष्ठ सहकारी म्हणून संपूर्ण उरण आणि पनवेल मध्ये ओळख असणारे राजेंद्र जगन्नाथ भगत यांची महाराष्ट्र प्रदेश कमिटी यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या आदेशानुसार आणि उरण तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे यांच्या सूचनेनुसार राजेंद्र जगन्नाथ भगत चिरनेर यांची उरण तालुका ओबीसी सेल ब्लॉक अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. राजेंद्र भगत यांच्या निवडीने नक्कीच पक्षाला फायदा होईल कारण पक्षासाठी रात्र-अपरात्री झटणारा कार्यकर्ता आणि पक्षाचे प्रखरपणे बाजू मांडणारा कार्यकर्ता म्हणून राजेंद्र भगत यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीमुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.



### जेएनपीएचे चेअरमन गौरव दयाळ यांचे महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन!

उरण (दैनिक संध्या) : आशिया खंडातील सर्वात मोठे बंदर असलेले उरण येथील सुप्रसिध्द जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण या बंदराचे (जेएनपीए) चेअरमन म्हणून गौरव दयाळ यांची नियुक्ती झालेली आहे. गौरव दयाळ हे २००४ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे जागतिक पातळीवर कामगारांचे नेतृत्व करतात. त्यामुळे जेएनपीएचे चेअरमन गौरव दयाळ यांची नुकतीच भेट घेऊन महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांनी त्यांच्याशी संवाद साधून जेएनपीएतील कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात चर्चा केली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संवाद साधण्यात आला. यावेळी किरीट पाटील आणि अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## पेट्रोल-डिझेलनंतर LPG दर वाढणार का?

मुंबई (दै. संध्या)

गेल्या काही महिन्यांपासून मध्य-पूर्वेतील तणावाचा अनेक देशांवर परिणाम होत आहे. परिणामी भारतात अलीकडे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. यामुळे एलपीजी, इतर गॅस आणि खतांच्या किमतीही लवकरच वाढू शकतात, अशी अटकळ बांधली जात आहे. केंद्र सरकारने आता या संदर्भात एक नवीन माहिती दिली आहे. देशात पुरेसा गॅस साठा असल्याचे सरकारने आश्वासन दिले आहे. देशातील परिस्थितीबाबत अद्ययावत माहिती दिली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी नुकतेच सांगितले की, तेल, वायू किंवा इतर कोणत्याही जीवनावश्यक वस्तूंची कमतरता नाही. पश्चिम आशियातील संकट सुरू होऊन अडीच महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे, आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील परिस्थिती अजूनही सामान्य नाही. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि एलपीजीच्या किमती लक्षणीयरीत्या वाढल्या आहेत. या सर्व घटकांमुळे आपल्या कच्च्या तेलाच्या, एलपीजीच्या आणि नैसर्गिक वायूच्या आयातीवरही परिणाम झाला आहे. आपल्या तेल शुद्धीकरण कारखाने सामान्यपणे कार्यरत आहेत आणि आपल्याकडे कच्च्या तेलाचा पुरेसा साठा आहे. या पत्रकार परिषदेदरम्यान, खत विभागाच्या सहसचिवांनी त्यांच्या विभागाच्या परिस्थितीबद्दलही माहिती दिली.

## 'लक्ष्मी निवास'च्या कलाकारांसाठी एक आवडती परंपरा बनली आहे!

मुंबई (दै. संध्या)



झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका मध्यमवर्गीय कुटुंबाचे जीवन, नातेसंबंध आणि माणसांना एकत्र बांधणाऱ्या आपुलकीचे भावपूर्ण चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. विशेष म्हणजे हीच आपुलकी आणि जिव्हाळा फक्त पडद्यावरच नाही, तर सेटवरही खास करून जेवण आणि एकत्र येण्याच्या क्षणांमध्ये दिसून येतो.

या मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारत असलेल्या अनुभवी अभिनेत्री मानसी जोशी रॉय यांनी नकळत झी टीव्हीच्या एका सेटवरून दुसऱ्या सेटपर्यंत एक गोडशी परंपरा पुढे चालू ठेवली आहे. 'माँ भी सास बहू थी' या मालिकेदरम्यान त्या नेहमी घरचे बनवलेला उंधियू सेटवर आणायच्या आणि त्याची कलाकार आणि टीममधील सगळेचजण आतुरतेने वाट पाहायचे. अनेक वर्षांनी 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही त्यांनी हीच परंपरा कायम ठेवली आहे आणि त्यामुळे जेवणाची वेळ ही आता संपूर्ण टीमसाठी एका छोट्या उत्सवासारखी असते.

याबद्दल बोलताना मानसी जोशी रॉय म्हणाल्या, "मला मनापासून लोकांना खायला घालायला आवडतं. त्यामुळे मी घरी काही खास बनवते, विशेषतः उंधियू. आणि तो सेटवर आणून सगळ्यांसोबत शेअर करायला मला खूप आनंद होतो. खरं तर यामुळे मला 'माँ भी सास बहू थी'च्या काळाची आठवण होते, तेव्हाही ही गोष्ट सेटवर एक प्रकारची खास परंपरा बनली होती. आणि आता 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही तीच परंपरा कुठेतरी पुढे चालू राहिली आहे. मी उंधियू आणला आहे हे कळताच सगळ्यांसाठी तो क्षण छोट्या सणासारखा बनतो. आम्ही सगळे एकत्र बसतो, जेवतो, गप्पा मारतो आणि त्या क्षणांमुळे सेटवर एका कुटुंबासारखी भावना निर्माण होते. मला वाटतं, अन्नामध्ये लोकांना जोडण्याची एक सुंदर ताकद असते आणि हीच आपुलकी पडद्यावरही नैसर्गिकपणे दिसून येते." पहा 'लक्ष्मी निवास' ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी 7 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## द्रोणागिरीत सकल हिंदू समाजच्या वतीने विराट हिंदू संमेलन

उरण (दै. संध्या)

- 'विराट हिंदू संमेलनात' हजारो हिंदूंची ऐतिहासिक उपस्थिती
- 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर दणाणला!



हिंदू धर्म विषयी जनजागृती व्हावी, हिंदू धर्मातील व्यक्ती, नागरिकांनी एकत्र यावे, हिंदू समाजाचे मजबूत संघटन उभे राहावे या दृष्टीकोणातून तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशभर हिंदू संमेलनांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, सकल हिंदू समाज द्रोणागिरी उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'विराट हिंदू संमेलन' प्रचंड जल्लोषात आणि उत्साहात संपन्न झाले. १७ मे रोजी सायंकाळी ६:०० वाजता, सेक्टर ५०, द्रोणागिरी येथील देवकृपा सोसायटीसमोर हा भव्य सोहळा पार पडला. या संमेलनाला द्रोणागिरी आणि उरण परिसरातील हिंदू समाज अत्यंत मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले म्हणजे यात कोणताही राजकीय पक्ष किंवा मान-सन्मान हा विषय नव्हता. कोणताही राजकीय हेतू अजेंडा बाजूला ठेवून केवळ आणि केवळ हिंदू धर्माबद्दल कमालीचा आदर आणि धर्माप्रती असलेली निष्ठा जपण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, जे या संमेलनाचे सर्वात मोठे यश ठरले. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेच्या भव्य दिंडी सोहळ्याने झाली. या दिंडीसोबत सुरू असलेला हरिपाठ, अभंगांचे सूर आणि हातात घेतलेले भगवे झेंडे यामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. या दिंडीच्या माध्यमातून संपूर्ण द्रोणागिरी मध्ये एक अभूतपूर्व भगवे चैतन्य निर्माण झाले होते. दिंडी परतल्यानंतर व्यासपीठावर राम भक्तीपर गीतांवर सांस्कृतिक कार्यक्रम बालचमूंनी सादर केले. शंख वादन गणेश वंदनेने उपस्थितांची मने जिंकली. "जय श्रीराम""गर्व से कहो हम हिंदू है_" छत्रपती शिवाजी महाराज की जय" आणि "छत्रपती संभाजी महाराज की जय" या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण द्रोणागिरी परिसर दणाणून गेला होता. या कार्यक्रमात डॉ निवेदिता भदाणे यांनी सादर केलेला अप्रतिम कथक नृत्य आविष्कार सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

संमेलनात उपस्थित प्रमुख वक्त्यांनी सनातन हिंदू धर्मावर आणि सद्यस्थितीवर प्रखर विचार मांडले. रमेश यादव महाराज यांनी सनातन हिंदू धर्म विषयी प्रखर विचार मांडले तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगातील रचनेचा दाखला देत त्यांनी उपस्थितांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

## 'आर्ट मॅजिक'मध्ये बालचित्रकार ते हौशी कलाकारांचा कलाविष्कार

पुणे (दै. संध्या)

निसर्गचित्रांच्या मनोहारी रंगछटा, महादेव, कृष्ण, गणपती यांसारख्या देवी-देवतांची विविध शैलींमधील आकर्षक चित्रे, प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांची हुबेहूब रेखाटने, चारकोल माध्यमातील प्रभावी कलाकृती आणि प्रसिद्ध स्थळांची देखणी चित्रे यामुळे 'आर्ट मॅजिक २०२६' प्रदर्शन कला रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरले. कलर पेन्सिल, पोस्टर कलर, अ‍ॅक्रेलिक, ऑइल पेंटिंग आदी विविध माध्यमांतून साकारलेल्या कलाकृतींमध्ये वयाच्या अवघ्या तीन वर्षांच्या बालचित्रकारांपासून ते ४० वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांची तसेच हौशी चित्रकारांची कल्पकता आणि सर्जनशीलता पुणेकरांना अनुभवायला मिळाली. आर्ट मॅजिक ड्रॉईंग क्लासेसतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'आर्ट मॅजिक २०२६' या १९ व्या चित्रकला प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बालगंधर्व कलादालन येथे या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी नगरसेविका प्रा. डॉ. निवेदिता गजानन एकबोटे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच प्रसिद्ध चित्रकार मलिकार्जुन सी. सिंदगी व सुनील सोनावणे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रदर्शनाच्या आयोजिका आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकार महालक्ष्मी भालचंद्र पवार असून सहआयोजक अंबादास भालचंद्र पवार आहेत. गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण करून त्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी करून घेण्याचे कार्य त्या करत आहेत.

# जीई एरोस्पेसकडून पुणे प्लांटमध्ये १०० कोटींची गुंतवणूक

पुणे (दै. संध्या)




जीई एरोस्पेसने आज आपल्या पुणे येथील उत्पादन प्लांटमध्ये 100 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा केली. यामुळे कंपनीचा भारतातील उत्पादन विस्तार अधिक दृढ होईल, ज्यासह देशाप्रती असलेली दीर्घकालीन कटिबद्धता अधिक प्रबळ झाली आहे. ही गुंतवणूक वेल्डिंगचे नवीन तंत्रज्ञान, प्रगत तपासणी उपकरणे, अचूक साधने, गेजेस, फिक्स्चर्स आणि अतिरिक्त पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी वापरली जाईल. उत्पादन क्षमता वाढवणे, प्रक्रिया अचूक करणे आणि जगभरातील ग्राहकांसाठी उच्च-गुणवत्तेचे कम्पोनण्ट्स पुरवणे हा यामागचा उद्देश आहे.

ही गुंतवणूक गेल्या दोन वर्षांत जाहीर केलेल्या 410 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर आधारित आहे. यामुळे तीन वर्षांच्या कालावधीत जीई एरोस्पेसची पुणे प्लांटमधील एकूण गुंतवणूक 510 कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. याआधीची गुंतवणूक प्रामुख्याने उत्पादन प्रक्रिया प्रगत करणे, ऑटोमेशन आणि नेक्स्ट-जनरेशन इंजिन कम्पोनण्ट्ससाठी क्षमता वाढवण्यावर केंद्रित होती. नव्या सुधारणांमुळे या सुविधेच्या क्षमतांचा अधिक विस्तार होईल आणि जीई एरोस्पेसच्या जीई90, जीईएनएक्स, जीई9एक्स आणि सीएफएम इंटरनॅशनलच्या लीप (LEAP) इंजिन प्रोग्राम्ससाठी लागणाऱ्या कम्पोनण्टच्या उत्पादनास पाठबळ मिळेल. "या सातत्यपूर्ण गुंतवणूकीमधून जीई एरोस्पेसची भारताप्रती असलेली दीर्घकालीन कटिबद्धता आणि आमच्या जागतिक उत्पादन नेटवर्कमध्ये पुणे प्लांटच्या भूमिकेबद्दलचा आमचा विश्वास दिसून येतो," असे जीई एरोस्पेसच्या पुणे उत्पादन प्लांटचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित सिंग म्हणाले. "आमची ही निरंतर वाढ आमचे ग्राहक आणि व्यापक समुदायासाठी फायदेशीर आहे, ज्यामुळे जीई एरोस्पेस आणि आमच्या पुरवठादार भागीदारांकडे अ‍ॅप्रेन्टिसशिप आणि रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होत आहेत. गेल्या दशकात, हा प्लांट उच्च-क्षमतेच्या एरोस्पेस मॅन्युफॅक्चरिंग हबमध्ये विकसित झाला आहे, ज्यामुळे भारतातील पुरवठादार परिसंस्था दृढ झाली असून जीई एरोस्पेसच्या जागतिक पुरवठा साखळीत मोलाचे योगदान मिळत आहे."जीई एरोस्पेसचे पुणे उत्पादन प्लांट कंपनीच्या जागतिक पुरवठा साखळीचा महत्त्वाचा भाग आहे., या प्लांटमध्ये व्यावसायिक विमान इंजिनांसाठी लागणारे महत्त्वपूर्ण कम्पोनण्ट्स तयार केले जातात. हा प्लांट भारतातील 2,200 हून अधिक जीई एरोस्पेस पुरवठादारांच्या व्यापक नेटवर्कमधील 300 हून अधिक स्थानिक पुरवठादारांसोबत काम करतो. प्रगत उत्पादन कौशल्य आणि अचूक अभियांत्रिकी क्षमतांच्या माध्यमातून जागतिक एरोस्पेस प्रोग्राममध्ये भारताची भूमिका प्रबळ करण्यास यामुळे मदत होत आहे. तसेच, हा प्लांट कर्मचारीवर्ग विकासामध्ये देखील महत्त्वाची भूमिका बजावतो. येथील दोन वर्षांच्या संरचित अ‍ॅप्रेन्टिसशिप प्रोग्रामांतर्गत दरवर्षी 500 हून अधिक प्रशिक्षणार्थींना वर्गातील शिक्षण आणि प्लांटच्या समर्पित वेल्ड स्कूलद्वारे विशेष टीआयजी वेल्डिंग प्रशिक्षण दिले जाते. 2015 पासून, या प्लांटने 5,000 हून अधिक उत्पादन सहकाऱ्यांना प्रशिक्षित केले आहे, ज्यामुळे भारतात एरोस्पेस उत्पादन क्षेत्रातील प्रतिभावान मनुष्यबळ तयार होण्यास मदत झाली आहे. अलीकडील समुदाय व मनुष्यबळ विकास अनुदानांनी या प्रदेशातील तांत्रिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपक्रमांनाही पाठबळ दिले आहे.

आजची ही घोषणा जीई एरोस्पेसच्या भारताप्रती असलेल्या व्यापक कटिबद्धतेला अधिक दृढ करते, जिथे कंपनी विमानांच्या भविष्याला आकार देण्यासाठी उत्पादन, अभियांत्रिकी आणि पुरवठा साखळी विकासात गुंतवणूक करणे सुरूच ठेवत आहे. सीएफएम इंटरनॅशनल ही जीई एरोस्पेस आणि सफ्रान एअरक्राफ्ट इंजिन्स यांच्यातील 50-50 भागीदारी असलेली संयुक्त कंपनी आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुरंदर उपसा योजनेचे दुसरे आवर्तन त्वरित द्या; शेतकऱ्यांची मागणी

जेजुरी (दैनिक संध्या) : मावडी आणि जवळार्जून परिसरातील शेतकऱ्यांच्या उन्हाळी पिकांसाठी पुरंदर उपसा योजनेतून नाझरे धरणाच्या कालव्यातून त्वरित पाणी सोडावे अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पुरंदर तालुक्यात नाझरे धरण परिसरात असणाऱ्या मावडी व जवळार्जून येथील शेतकऱ्यांनी शेतीतील पिकांसाठी पुरंदर उपसा योजनेतून उन्हाळी आवर्तनाची मागणी केली होती. त्यानुसार 10 मे रोजी 20 क्युसेस ने पाणी सोडण्यात आले मात्र हे पाणी अत्यंत कमी होते. पुन्हा 11 मे रोजी रोजी 50 क्यूसेस ने पाणी सोडण्यात आले. तरी सुध्दा शेतकऱ्यांच्या शेती पर्यंत पाणी येवू शकले नाही. दि 18 रोजी येथील शेतकरी सोमनाथ राणे, अड महेश राणे, प्रकाश भामे, प्रल्हाद राणे, सचिन राणे, गुलाब टेकवडे, नवनाथ कुंजीर, तसेच शेतकऱ्यांनी पुरंदर उपसा योजना व नाझरे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. पाणी जास्त कयुसेस ने सोडावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दिनांक 20 मे पाणी न सोडल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

### पुणे जिल्ह्याची स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर; आचारसंहिता लागू

पुणे (दैनिक संध्या) : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



### पंढरपूरमध्ये आज पासून डिजिटल जनगणनेस सुरुवात; सहकार्य करण्याचे आवाहन

पंढरपूर (दैनिक संध्या) : केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशनानुसार पंढरपूर शहरात 1 मे 2026 पासून डिजिटल जनगणना मोहिमेस प्रारंभ झालेला असून प्रगणकांना आपली वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे,असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे. सदरील जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविली जात आहे.जनगणनेचा पहिला स्वगणणेचा टप्पा पूर्ण झालेला असून दिनांक 16 मे ते 14 जून 2026 या कालावधीतील दुसऱ्या टप्प्याच्या प्रत्यक्ष कामकाजास आजपासून सुरुवात झालेली आहे.याकामी श्री.रमेश भोसले,सहसंचालक, जनगणना संचालनालय कार्यालय,मुंबई यांनी प्रत्यक्ष भेट देऊन बोहरी पेट्रोल पंप येथील भागातील सुरू असलेल्या कामाची माहिती घेतली व त्या भागाचे प्रगणक,पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन केले.त्यावेळी त्यांचेसह मा.जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील जनगणना अधिकारी श्री.महेश रोकडे मुख्याधिकारी हे उपस्थित असून यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी केली व प्रगणकांना मार्गदर्शन केले.याकामी पंढरपूर शहरात जनगणनेचे प्रत्यक्ष कामकाज करण्याकरीता पंढरपूर शहरांमध्ये 25 पर्यवेक्षक व 150 प्रगणकांची नियुक्ती करण्यात आलेली असून प्रगणक या कामे घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील.त्या अनुषंगाने श्री.महेश रोकडे,मुख्याधिकारी,नगरपरिषद पंढरपूर यांनी जनगणनेच्या कामकाजाकरीता नियुक्त प्रगणक घरी आल्यानंतर यांना वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे,असे आवाहन केले आहे.

# उन्हाच्या तडाख्यात शेतमजूर महिलांचे हाल

## ३०० रुपयांत संसार चालवताना कसरत : महागाई, उष्माघाताचा धोका आणि बिबट्यांच्या भीतीत आंबेगावातील महिला शेतात राबत आहेत

**पारगाव (दै. संध्या)**



आंबेगाव तालुक्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असून, या रणरणत्या उन्हात देखील शेतातील कामे मात्र थांबलेली नाहीत. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत शेतात राबणाऱ्या शेतमजूर महिलांचे मोठे हाल होत आहेत. एका बाजूला निसर्गाचा रुद्रावतार, तर दुसऱ्या बाजूला वाढती महागाई, यामुळे या महिलांचे जीवन अधिकच कठीण बनले आहे.

सध्या स्वयंपाकासाठी गॅस सिलिंडर मिळत नाही. चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे. पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, खतांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. दैनंदिन गरजांच्या वस्तू महाग झाल्याने मिळणाऱ्या मजुरीत घरखर्च भागविणे अवघड झाल्याची खंत शेतमजूर महिलांनी व्यक्त केली. दिवसभर उन्हात कष्ट करूनही केवळ 300 रुपयांची मजुरी मिळत असल्याने संसाराचा गाडा हाकताना मोठी कसरत करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. यंदाचा उन्हाळा आत्तापर्यंतच्या सर्वाधिक तीव्र उन्हाळ्यांपैकी एक असल्याचे महिलांचे म्हणणे आहे. दुपारच्या कडक उन्हात अंगाची लाहीलाही होत असताना देखील पोटासाठी शेतात उतरावे लागत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी महिला डोक्यावर छत्र्या, स्कार्फ, टोपी तसेच पूर्ण अंग झाकणारे कपडे वापरताना दिसत आहेत. तरीही उष्माघाताचा धोका कायम असल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आंबेगाव तालुक्यात एका महिलेचा उष्माघाताने बळी गेल्याची घटना देखील नुकतीच आमोंडी गावात घडली आहे. तालुक्याच्या अनेक भागांत बिबट्यांचा वावर वाढल्याने शेतात काम करताना महिलांना सतत धास्ती वाटत आहे. विशेषतः ऊस, मका आणि दाट पिकांच्या शेतात काम करताना जीव मुठीत धरून काम करावे लागत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा काम करताना बिबट्यांच्या हालचालींची भीती अधिक जाणवत असल्याचेही महिलांनी सांगितले. महागाई, कमी मजुरी, वाढते तापमान आणि वन्यप्राण्यांची भीती, या चौफेर संकटात शेतमजूर महिला सापडल्या असून, शासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे. शेतमजूर महिलांसाठी विशेष आरोग्य सुविधा, उन्हाळी संरक्षण साहित्य, वाढीव मजुरी तसेच अत्यावश्यक वस्तूंवरील दरनियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी महिलांकडून करण्यात येत आहे.

## सोशल मीडिया आणि हेरिटेज वॉकमुळे पर्यटकांचा वाढता प्रतिसाद



**पुणे (दै. संध्या)**

मोबाईलच्या जगातून बाहेर पडत आता पर्यटकांची पावले इतिहासाचा प्रत्यक्ष स्पर्श अनुभवण्यासाठी पुण्यातील दुर्मीळ वस्तूंचे जतन करणाऱ्या संग्रहालयांकडे वळत आहेत. सोशल मीडियावरील आकर्षक व्हिडीओ, माहितीपट, रील्स, छायाचित्रे, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि शहरात वाढलेल्या हेरिटेज वॉकमुळे संग्रहालयांबद्दल पर्यटकांमध्ये उत्सुकता निर्माण होत असून, त्यामुळे संग्रहालयांमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे.

महाराष्ट्रासह देशभरातील पर्यटक पुण्याचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जाणून घेण्यासाठी संग्रहालयाला भेट देत आहेत. यंदाच्या उन्हाळी सुट्यांमध्ये संग्रहालयांमध्ये पर्यटकांची गर्दी होत आहे आणि त्यामुळे शहरातील 'हेरिटेज टुरिझम'ला चालना मिळाली आहे. इतिहास, कला-संस्कृतीचा वारसा जपणारी पुण्यात सध्या अंदाजे 30 ते 35 संग्रहालये कार्यरत आहेत. राजा दिनकर केळकर संग्रहालय, पर्वतीवरील पेशवे संग्रहालय, रेल्वे म्युझियम, सायकल संग्रहालय, क्रिकेट संग्रहालय अशा विविध संग्रहालयांमध्ये रोज पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. काळानुसार बदलत संग्रहालयांनीही आधुनिकतेची कास धरल्यानेच हा बदल झाल्याचे दिसून येत आहे. डिजिटल डिस्प्ले, ऑडिओ गाइड, थी-डी व्हर्च्युअल टूर, एआयवर आधारित व्हिडीओ, सोशल मीडियासाठी खास 'फोटो स्पॉट' यामुळे तरुणाई आणि लहान मुलांचा प्रतिसाद वाढत आहे.

अनेक संग्रहालये फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यू-ट्यूबवरून दुर्मीळ वस्तूंची माहिती सातत्याने देत असल्याने इतिहासाविषयी उत्सुकता निर्माण होत आहे. विशेष म्हणजे, संग्रहालयांची आर्थिक स्थितीही सुधारली आहे. राजा दिनकर केळकर संग्रहालयाचे संचालक सुधन्वा रानडे म्हणाले की, गेल्या दोन वर्षांत परिस्थिती बदलली आहे. आम्ही सोशल मीडियावरून संग्रहालयातील दुर्मीळ वस्तूंची माहिती सातत्याने देत आहोत. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर देशभरातून पर्यटक भेट देत आहेत.

**सोशल मीडियावरील प्रसिद्धी, छायाचित्रे, व्हिडीओ आणि हेरिटेज वॉकमुळे संग्रहालयाबद्दल उत्सुकता वाढत आहे. त्यामुळे आठवडाभर पर्यटकांची गर्दी होत असून, उन्हाळी सुटीत प्रतिसाद आणखी वाढला आहे.**
**- देववत जोशी, जोशीज् मिनिएचर रेल्वे म्युझियम**

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीला गती; ३१ मे पर्यंत जाहिरातींची अंतिम मुदत

**पुणे (दै. संध्या)**



शिक्षण आयुक्तालयाने 'पवित्र पोर्टल'द्वारे शिक्षक पदभरतीची प्रक्रिया गतिमान केली आहे. त्यानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि खासगी शैक्षणिक संस्थांना रिक्त शिक्षकपदांच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी 31 मे 2026 पर्यंतचा कालावधी निश्चित करून दिला आहे. शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांनी स्पष्ट आदेश जारी केले आहेत.

माध्यमिक शाळांमधील रिक्तपदांचा आढावा घेतला असून, मे 2026 अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांना विचारात घेऊन ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. नियुक्ती प्राधिकाऱ्यांना रिक्तपदांच्या 80 टक्के मर्यादित मागणी नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया 31 मार्च 2026 पूर्वी पूर्ण केली आहे. यामुळे रिक्तपदांची नेमकी संख्या पवित्र पोर्टलवर उपलब्ध होणे सोपे झाले आहे. आता सर्व संबंधित संस्थांनी दिलेल्या मुदतीत जाहिराती प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण आयुक्तालयाने केले आहे. ही भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यातील शाळांमधील शिक्षकांच्या कमतरतेवर बऱ्याच प्रमाणात तोडगा निघण्याची अपेक्षा आहे. विशेषत: ग्रामीण भाग आणि खासगी संस्थांमधील रिक्त जागा भरण्यासाठी ही संधी महत्त्वाची ठरणार आहे.

## महिंद्रा अँड महिंद्रा येथे इंटर्नशिप कॅम्प; ५१० जागांसाठी २० मे रोजी मुलाखती

**पुणे (दै. संध्या)**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी Mahindra & Mahindra येथे इंटर्नशिपची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून २० मे २०२६ रोजी थेट इंटर्नशिप कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे.

सदर कॅम्पचे आयोजन महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लिमिटेड, गेट क्रमांक २, महिंद्रा व्हेईकल मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड, चाकण, पुणे येथे बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून करण्यात आले आहे.

या कॅम्पअंतर्गत १२ वी उत्तीर्ण उमेदवारांसाठी ५०० तर आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांसाठी १० अशा एकूण ५१० जागा उपलब्ध आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना ६ ते ९ महिन्यांच्या कालावधीसाठी दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीकडून प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे. उमेदवाराची वयोमर्यादा 18 ते 25 वर्ष आहे.

इच्छुक उमेदवारांनी अद्ययावत बायोडाटा, शैक्षणिक प्रमाणपत्रे, झेरॉक्स प्रती, आधार कार्ड अथवा जन्मदाखला, तसेच पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुणे विभागात अवयव प्रत्यारोपणात मोठी वाढ; रुग्णांना नवसंजीवनी

### गेल्या ५ वर्षांत प्रत्यारोपण रुग्णसंख्या दुप्पट; जागरूकता आणि समन्वयामुळे अवयवदानाला गती

**पुणे (दै. संध्या)**



पुणे विभागात गेल्या पाच वर्षांत अवयव प्रत्यारोपणाच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. पुणे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती (झेडटीसीसी) आणि पुणे परिमंडळ आरोग्य उपसंचालक कार्यालयाच्या माहितीनुसार, 2021 मध्ये 44 अवयवदात्यांकडून 97 रुग्णांमध्ये प्रत्यारोपण केले होते. ही संख्या 2025 मध्ये 207 वर पोहोचली आहे. अवयवदात्यांची संख्याही 44 वरून 79 पर्यंत वाढली आहे.

अवयवदानाबाबत समाजात वाढती जागरूकता, रुग्णालयांमधील समन्वय, तातडीने उभारला जाणारा ग्रीन कॉरिडॉर आणि नातेवाइकांचे प्रभावी समुपदेशन यामुळे प्रत्यारोपण प्रक्रियेला गती मिळाल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. विशेषतः मेंदूमृत रुग्णांच्या नातेवाइकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचेही आरोग्य विभागातर्फे सांगण्यात केले. रुग्णाला मेंदूमृत घोषित केल्यानंतर नातेवाइकांचे समुपदेशन केले जाते. नातेवाइकांच्या धाडसामुळे मेंदूमृत रुग्णाकडून हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुप्फुसे, स्वादुपिंड, डोळे आणि त्वचा यांसारखे अवयव दान झाल्याने इतर रुग्णांना नवसंजीवनी मिळणे शक्य झाले आहे. एका दात्यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात.

गेल्या पाच वर्षांत मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपणात सर्वाधिक वाढ झाली आहे. 2021 मध्ये 49 किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या होत्या; ती संख्या 2025 मध्ये 117 वर पोहचली. याच काळात यकृत प्रत्यारोपण 41 वरून 67 पर्यंत वाढले. फुप्फुस प्रत्यारोपणाची संख्याही शून्यावरून 13 पर्यंत गेली आहे.

अवयवदानाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होत असून, अधिकाधिक कुटुंबे पुढाकार घेत आहेत. वेळेवर समुपदेशन आणि यंत्रणांमधील समन्वयामुळे अधिक रुग्णांना नवजीवन देणे शक्य होत आहे.
**- डॉ. भगवान पवार, आरोग्य उपसंचालक, पुणे परिमंडळ**

## देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याविरोधात मंदिरे एकवटली !

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक देवस्थानांच्या शेकडो एकर जमीनीला धोका पोहोचवणारा 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' कोणत्याही अटीशिवाय राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी आज येथे आयोजित अष्टविनायक मंदिरांच्या विश्वस्तांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली. महसूल व वन विभागाने पुढे सरकवलेला हा मसुदा म्हणजे हिंदू मंदिरांची स्वायत्तता आणि त्यांच्या उत्पन्नाचे ऐतिहासिक स्रोत मुळापासून मोडीत काढण्याचे पद्धतशीर कारस्थान आहे. एका बाजूला अल्पसंख्याकांच्या संस्थांना कायदेशीर अभेद्य कवच द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला हिंदूंच्या पवित्र मंदिरांची मालमत्ता व्यक्तींच्या खाजगी घशात घालायची, हा सरकारी दुजाभाव अष्टविनायक मंदिरे कदापि सहन करणार नाही, सर्व अष्टविनायक मंदिरांचा या प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका 'चिंचवड देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त श्री. केशव विद्वांस यांनी अष्टविनायक मंदिरांच्या संयुक्त पत्रकार परिषदेद्वारे मांडली.

पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेला अष्टविनायक मंदिरे समितीच्या वतीने श्री मयुरेश्वर (मोरगांव), श्री चिंतामणी (थेऊर), श्री सिद्धिविनायक (सिद्धटेक), श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिर आदीचे व्यवस्थापन पहाणारे चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस, श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष श्री. वैभव आपटे, श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट ओझरचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण कवडे, श्री गणपती देवस्थान महडचे विश्वस्त श्री. किरण काशीकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट हे उपस्थित होते. राज्यातील सर्वच देवस्थानांना ग्रासणाऱ्या या संभाव्य संकटामुळे आता महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि धार्मिक वैभव असलेली पवित्र अष्टविनायक मंदिरेही या विरोधात पुढे आली असून त्यांनी या कायद्याला कडाडून विरोध दर्शवला आहे. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस म्हणाले की , छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मोरगाव, सिद्धटेक, पाली, महाड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव या अष्टविनायकांच्या मंदिरांमध्ये त्रिकाळ पूजा-अर्चा, महाप्रसाद, अखंड अन्नछत्र, नैवेद्य आणि वार्षिक उत्सव अविरत चालण्यासाठी शेकडो एकर जमिनी 'इनाम' म्हणून दिल्या आहेत. कायदेशीर नियमांनुसार मंदिराची 'मूर्ती' हीच एक 'कायदेशीर व्यक्ती' (Juristic Person) असून या जमिनींची एकमेव मालक आहे; परंतु या प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे एका झटक्यात ही ऐतिहासिक इनामे रद्द होऊन, देवतेच्या जमिनी वहिवाटदार, मिरासदार किंवा पुजारी यांच्या नावे खाजगी मालमत्ता म्हणून वर्ग केल्या जातील. परिणामी ज्या जमिनी पिढ्यानपिढ्या केवळ बाप्पाच्या धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी वापरल्या गेल्या, त्यांचे व्यापारीकरण होऊन तिथे व्यावसायिक मॉल किंवा हॉटेल्स उभी राहतील आणि भूमाफियांच्या टोळ्या मंदिरांची भूमी गिळंकृत करतील. उत्पन्नाचे मूळ साधनच नष्ट झाल्यामुळे ही स्वाभिमानी देवस्थाने भविष्यात शासकीय अनुदानावर परावलंबी आणि हतबल होतील, अशी गंभीर आणि रास्त भीती निर्माण झाली आहे. श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे म्हणाले की, या मसुद्यातील कलम १ (उपकलम २) अत्यंत पक्षपाती आणि निषेधार्ह आहे, ज्याद्वारे वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील जमिनींना या कायद्यातून पूर्णपणे वगळून विशेष संरक्षण देण्यात आले आहे. केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींचे 'निर्मूलन' करणे आणि इतर धर्मीयांच्या संस्थांना पाठीशी घालणे, हा प्रकार संविधानाच्या कलम १४ मधील 'समानतेच्या अधिकाराचा' उल्लंघन आहे. धर्मनिरपेक्षतेचे धोरण राबवणाऱ्या राज्यात बहुसंख्य हिंदू समाजाला आणि त्यांच्या मंदिरांना अशी दुय्यम वागणूक देणे अत्यंत संतापजनक आहे.

